

दैनिक सिंहवाणी वृत्त

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ८ | वर्ष : १ | अंक : ३२९ | किंमत : २ रूपये

१ जानेवारी २०१५ पूर्वीचा एकही पुरावा असेल तरी शेतकऱ्यांना मिळणार फार्मर आयडी

राज्य सरकारचा दिवाळीपूर्वी मोठा निर्णय, १ लाख ६० हजार शेतकऱ्यांना लाभ, रखडलेल्या पीक पाहणीसाठी ऑफलाइन सुविधाही उपलब्ध : चंद्रशेखर बावनकुळे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारे दोन महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतले आहेत. १ जानेवारी २०१५ पूर्वी शेतजमीन कसत असल्याचा कोणताही एक पुरावा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे १ लाख ६० हजार शेतकऱ्यांना लाभ मिळणार असून, दिवाळीच्या निमित्ताने सरकारने शेतकऱ्यांना ही मोठी भेट दिली आहे, अशी माहिती महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले की, राज्यातील अनेक भागांमध्ये आदिवासी बांधवांसह अनेक शेतकरी वर्षानुवर्षे जमिनी कसत आहेत. मात्र, त्यांच्या नावावर जमिनीचे पट्टे नाहीत. त्यामुळे त्यांना विविध शासकीय योजनांमध्ये समावेश होत नाही. काही ठिकाणी वेगवेगळ्या कारणांमुळे फार्मर आयडीदेखील तयार झालेला नाही. अशा शेतकऱ्यांसाठी महसूल विभागाने विशेष प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार केली आहे.

१ जानेवारी २०१५ पूर्वी संबंधित जमीन कसत असल्याचा एकही पुरावा उपलब्ध असल्यास अशा शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात येणार आहे. हस्तलिखित महसुली नोंदी, उपलब्ध अधिकार अभिलेख आणि इतर पुराव्यांच्या आधारे ही प्रक्रिया राबविली जाईल. जमीन सरकारी असली तरी संबंधित शेतकरी ती कसत असल्याचा पुरावा असल्यास त्याला फार्मर आयडी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

रखडलेल्या पीक पाहणीसाठी ऑफलाइन पर्याय

शेतकऱ्यांच्या हिताचा आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला आहे. पीक पाहणीची प्रक्रिया ऑनलाइन करताना अनेक शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे एक लाखाहून अधिक शेतकऱ्यांची पीक पाहणी रखडली होती. ही अडचण दूर करण्यासाठी आता ऑफलाइन पीक पाहणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे पीक पाहणीची प्रक्रिया अधिक सुलभ होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

मंत्र्यांची शेतकऱ्यांच्या घरी दिवाळी

राज्यातील सर्व मंत्र्यांनी आपापल्या भागातील शेतकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्याचा निर्धार केला आहे. आम्ही लोहारी सांगवा गावात मुक्कामी जाणार आहोत. अनेक वर्षांपासून रखडलेल्या प्रकल्पाला उद्या चालना देऊन त्याची भेट शेतकऱ्यांना देणार आहोत. मुख्यमंत्री स्वतः शेतकऱ्याच्या घरी मुक्काम करणार असल्याने यंदाची दिवाळी शेतकऱ्यांसाठी निश्चितच गोड ठरेल, असे बावनकुळे म्हणाले.

दैनिक सिंहवाणी वृत्तच्या 'दीपरंग-२०२६'चे प्रकाशन



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 'दीपरंग-२०२६' दिवाळी विशेषांकाचे दिमाखात प्रकाशन!

साहित्याचा सुगंध, शब्दांचा प्रकाश अन् रंगीत पानांची आकर्षक सजावट; १५० हून अधिक पानांचा साहित्यिक नजराणा वाचकांच्या भेटीला!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : साहित्य, संस्कृती आणि सर्जनशीलतेचा सुरेख संगम साधणाऱ्या दैनिक सिंहवाणी वृत्ततर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'दीपरंग-२०२६' या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. दिवाळीच्या प्रकाशपर्वात वाचकांसाठी शब्दांची अनोखी मेजवानी घेऊन आलेल्या या विशेषांकात वाचनीय कथा, वैचारिक लेख, आशयघन कविता आणि विविध साहित्यिक लेखनाचा समावेश करण्यात आला आहे. आकर्षक मांडणी, कलात्मक सजावट आणि दर्जेदार रंगीत मुद्रण ही या अंकाची विशेष वैशिष्ट्ये आहेत. तब्बल १५० हून अधिक पानांचा हा संपूर्ण रंगीत दिवाळी विशेषांक साहित्यप्रेमींसाठी एक दर्जेदार वाचनानुभव ठरणार आहे.

या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ज्येष्ठ संपादक व लेखक श्याम पेठकर तसेच दैनिक सिंहवाणी वृत्तचे संपादक अजय बिवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. 'दीपरंग-२०२६' या दिवाळी विशेषांकाची संकल्पनात्मक मांडणी, आकर्षक सजावट आणि कलात्मक निर्मितीची जबाबदारी सुप्रसिद्ध आर्टिस्ट राजेंद्र क्षीरसागर यांनी समर्थपणे सांभाळली आहे. त्यांच्या कल्पक कलाविष्कारामुळे या अंकाच्या सौंदर्यात विशेष भर पडली आहे. केवळ दिवाळी अंक नव्हे, तर साहित्यिक अभिरुची, कलात्मकता आणि वैचारिक समृद्धीचा प्रकाश वाचकांपर्यंत पोहोचविणारा 'दीपरंग-२०२६' हा विशेषांक दिवाळीच्या आनंदात शब्दवैभवाची अनोखी भर घालणारा ठरणार आहे.



नालासोपाऱ्यात फटाक्याच्या ठिणगीने वाहनांना आग

वसई: दिवाळीच्या सणाचा उत्साह शिगेला पोहचला असतानाच नालासोपाऱ्यात फटाक्यांच्या ठिणगीमुळे पार्किंग मध्ये उभ्या असलेल्या वाहनांना भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. ही घटना शनिवारी दुपारी १२ च्या सुमारास घडली असून यात दोन चारचाकी वाहने जळून खाक झाली आहेत. नालासोपारा पूर्वेच्या शिर्डीनगर परीसरात दिवाळी असल्याने लहान मुलं फटाके फोडत होती. याच दरम्यान फटाक्यांची ठिणगी पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनावर उडाली आणि अचानकपणे आग भडकली. हळूहळू आगीची तीव्रता वाढली आणि बाजूला उभ्या असलेल्या चारचाकी वाहनाने ही पेट घेतला.

एसटी महामंडळाची एनसीएमएस कार्डसाठी मुदतवाढ

मुंबई : महिला प्रवाशांना १ ऑक्टोबरपासून एनसीएमएस कार्ड अनिवार्य केल्याचे दि.२८ सप्टेंबर रोजी एसटी महामंडळाने आदेश जारी केले होते. या पत्रानुसार जेष्ठ नागरिक, महिला प्रवाशांना बसचे सवलतीचे तिकीट प्राप्त करण्यासाठी एनसीएमएस कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. परंतू आजपर्यंत केवळ १.१० कोटी महिला लाभार्थ्यांनी कार्ड नोंदणी केल्यामुळे या योजनेस दि. ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या कार्डच्या माहिती अभावी अद्यापपर्यंत महिलांनी मोठ्या प्रमाणात नोंदणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महिला लाभार्थ्यांना राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासातील तिकीट सवलतीकरिता अनिवार्य करण्यात आलेली एनसीएमएस कार्डची अट दि.७ नोव्हेंबरपासून दि. ३१ डिसेंबरपर्यंत शिथिल करण्यात आली आहे. या कालावधीत सर्व महिला लाभार्थ्यांनी सदर कार्डसाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

चर्चगेट-विरार फास्ट लोकलमध्ये प्रवाशांची तुफान हाणामारी, एकजण धावत्या ट्रेनमधून फेकला गेला

वृत्तसंस्था, मुंबई : मुंबईची लाइफलाइन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकल ट्रेनमधील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. चर्चगेटहून विरारच्या दिशेने जाणाऱ्या फास्ट लोकलमध्ये दोन प्रवाशांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, या मारहाणीदरम्यान एका प्रवाशाला चालत्या लोकलमधून बाहेर फेकले गेले. सुदैवाने लोकलचा वेग कमी असल्याने मोठा अनर्थ टळला. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना काल रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली. चर्चगेटहून विरारच्या दिशेने जाणाऱ्या फास्ट लोकलमध्ये ग्रँट रोड आणि मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकादरम्यान दोन प्रवाशांमध्ये वाद झाला. लोकलच्या दरवाजात उभे राहण्यावरून या दोघांमध्ये सुरुवातीला शाब्दिक वाद झाला. मात्र, काही वेळातच या वादाचे रूपांतर जोरदार हाणामारीत झाले. दोन्ही प्रवाशांमध्ये मारामारी सुरू असताना परिस्थिती अधिकच गंभीर बनली. एकमेकांना मारहाण करत असतानाच त्यातील एक प्रवासी चालत्या लोकलमधून बाहेर फेकला गेला. धावत्या लोकलमधून प्रवासी खाली पडल्याने डब्यातील इतर प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. या घटनेत सुदैवाची बाब म्हणजे, ज्या वेळी हा प्रकार घडला, त्यावेळी लोकल मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्मवरून जात होती. त्यामुळे लोकलचा वेग तुलनेने कमी होता. याच कारणामुळे मोठा अपघात टळल्याचे सांगितले जात आहे. मात्र, भरधाव लोकलमधून प्रवासी बाहेर फेकला जाण्याच्या या घटनेने प्रवाशांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. या संपूर्ण हाणामारीचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. लोकलमधील प्रवाशांमध्ये झालेली मारामारी आणि त्यादरम्यान घडलेला धक्कादायक प्रकार व्हिडिओमध्ये पाहायला मिळत असल्याचा दावा केला जात आहे. दरवाजात उभे राहण्यासारख्या किरकोळ कारणावरून वाद इतका विकोपाला जाऊ शकतो, यामुळे प्रवाशांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.







संपादकीय लेखणीतून...

आर्थिक दुर्बल व वंचित घटकांच्या अडचणी न्यायप्रविष्ट

राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन दरवर्षी दि. ९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे सर्व नागरिकांना न्याय मिळवून देणे आणि विशेषतः आर्थिदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांसाठी न्यायप्रविष्ट होण्याच्या मार्गात असलेल्या अडचणी दूर करणे होय. भारताच्या संविधानानुसार प्रत्येक नागरिकाला न्याय मिळणे हे मूलभूत हक्क आहे, परंतु अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे गरीब वगासाठी न्याय मिळवणे कठीण होते. राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिनाच्या निमित्ताने, विविध कायदा सेवा प्राधिकरणे व न्यायालये मोफत कायदेविषयक सल्ला, तक्रारींचे निवारण आणि जनजागृती अभियान राबवतात. या दिवसाचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता वाढवणे आणि न्याय व्यवस्थेत त्यांचा विश्वास वाढवणे होय. आपल्या भारतामध्ये दरवर्षी दि. ९ नोव्हेंबर हा दिवस "राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन म्हणून साजरा केला जातो.

हा दिवस सन १९९५ पासून साजरा करण्यास सुरुवात झाली. दि. ९ नोव्हेंबर १९९५ रोजी "कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा-१९८७" प्रत्यक्ष अमलात आला. समाजातील गरीब, दुर्बल, वंचित, महिला, अनुसूचित जाती-जमाती आणि दिव्यांग घटकांना मोफत, सक्षम व त्वरित कायदेविषयक मदत मिळावी तसेच न्याय प्रक्रियेत सर्वांना समान संधी असावी, वासाठी जनजागृती करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या कायद्यांतर्गत नॅशनल लीगल सर्व्हिसेस अथॉरिटी, राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. देशभरात मोफत कायदेशीर सल्ला, वकील पुरवणे आणि "लोकअदालत"चे आयोजन केले जाते.

संविधानातील कलम ३९अ नुसार नागरिकांना मोफत कायदेशीर मदत आणि समान न्याय मिळावा या तत्त्वावर हा दिवस आधारित आहे. सामान्य नागरिकांना त्यांचे कायदेशीर अधिकार, कायदेविषयक योजना आणि विवाद निवारण पद्धतींची (उदा. लोकअदालत) माहिती दिली जाते. अधिकृत माहिती आणि मोफत कायदेशीर मदतीसाठी आपण महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

दि. ९ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय विधी-कायदेशीर सेवा दिन, भारतीय विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ च्या अंमलबजावणीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. बऱ्याच देशांमध्ये मध्यस्थी आणि कायदेशीर सेवांसारखे विनामूल्य कायदेशीर सेवा उपक्रम सामान्यतः अव्यवस्थित असतात, मागणी अभावी किंवा ग्राहकांच्या गर्दीमुळे ते बंद होतात. लोक अदालत, मध्यस्थी आणि मोफत कायदेशीर मदत यांसारख्या पर्यायी विवाद निराकरण पद्धती तयार करण्यात आल्या आहेत; तथापि प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी कोणतेही विशेष कायदे लागू करण्यात आलेले नाहीत. दि.११ ऑक्टोबर १९८७ रोजी कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा १९८७ लागू करण्यात आला. हा कायदा दि. ९ नोव्हेंबर १९९५ रोजी अंमलात आला. भारताचे राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरण दि. ५ डिसेंबर १९९५ रोजी त्याच्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आले. गरजू लोकांना मोफत कायदेशीर मदत आणि सल्ला देणे, मध्यस्थी आणि सलोख्याने समझोता करून प्रकरणांचा निपटारा करणे यासह विविध उपक्रम हाती घेतले. भारतीय न्यायालयांवरील प्रलंबित प्रकरणांचा भार (बॅकलॉग) कमी करण्यासाठी तसेच गरजू पक्षकारांना न्याय मिळवून देण्यासाठी हा एक अनोखा प्रयत्न होता. या प्रसंगाचे स्मरण म्हणून, कायद्याच्या अंमलबजावणीचा दिवस १९९५ मध्ये प्रथमच "राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन" म्हणून साजरा करण्यात आला. प्रत्येक राज्याचे कायदेशीर सेवा प्राधिकरण राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावरील संस्थांमार्फत या दिवसाचे आयोजन करतात.

कायदेशीर सेवा प्राधिकरण कायद्यांतर्गत असलेल्या विविध तरतुदी आणि पक्षकारांच्या हक्कांविषयी लोकांना जागरूक करण्यासाठी कायदेशीर सेवा दिन साजरा केला जातो. प्रत्येक अधिकारक्षेत्र लोक अदालती, कायदेशीर मदत शिबिरे आणि कायदेशीर मदत कार्यक्रम आयोजित करते.

लक्ष्मी पूजन : धनापलीकडील सुख, शांती आणि समृद्धीचा मंगलमय उत्सव

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

लक्ष्मी पूजन हा दीपावलीच्या सणांमधील सर्वात महत्त्वाचा आणि मंगलमय दिवस मानला जातो. या दिवशी माता लक्ष्मी आणि भगवान गणेश यांची मनोभावे पूजा करून घरात सुख, समृद्धी, ऐश्वर्य आणि शांतता नांदो, अशी प्रार्थना केली जाते. दीपावली म्हणजे दिव्यांचा सण, अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा उत्सव. या महोत्सवाचा मुख्य कणा म्हणजेच 'लक्ष्मी पूजन'. आश्विन/कार्तिक महिन्याच्या अमावस्येला संपूर्ण देशभरात हा सण मोठ्या उत्साहाने आणि श्रद्धेने साजरा केला जातो. या दिवशी संध्याकाळी घराघरांमध्ये दिव्यांची रोषणाई केली जाते, अंगणात सुंदर रांगोळी काढली जाते आणि माता लक्ष्मीचे स्वागत केले जाते.

पौराणिक कथेनुसार, कार्तिक अमावस्येच्या दिवशी समुद्रमंथनातून माता लक्ष्मी प्रकट झाली होती. म्हणूनच हा दिवस लक्ष्मीचा जन्मोत्सव म्हणून साजरा केला जातो. असे मानले जाते की, या रात्री माता लक्ष्मी पृथ्वीवर भ्रमण करते आणि ज्या घरांमध्ये स्वच्छता, प्रकाश आणि भक्ती असते, तिथे ती कायमचा निवास करते.

लक्ष्मी पूजन हे केवळ भौतिक धन किंवा पैसा मिळवण्यापुरते मर्यादित नाही. हा सण आपल्याला 'सत्त्व गुणांचा' स्वीकार करण्याचा संदेश देतो. धन हे कष्टाचे, प्रामाणिकपणाचे आणि इतरांच्या कल्याणासाठी वापरणारे असावे, हीच माता लक्ष्मीची खरी शिकवण आहे. घरामध्ये सुख, शांती, आरोग्य आणि समाधान नांदणे म्हणजेच खरी लक्ष्मी प्राप्ती होय.

लक्ष्मी पूजनाच्या रात्री घराघरांत दिवे प्रज्वलित केले जातात. पण त्याच वेळी आपण आपल्या अंतर्मनातील अंधार दूर करण्याचाही संकल्प केला पाहिजे. लोभ, मत्सर, द्वेष, अन्याय, असत्य आणि अहंकार हे मानवी जीवनातील खरे अंधार आहेत. ज्ञानाचा प्रकाश अज्ञान दूर करतो. प्रेमाचा प्रकाश द्वेष दूर करतो. करुणेचा प्रकाश क्रौर्य दूर करतो आणि सत्याचा प्रकाश असत्यावर विजय मिळवितो. म्हणूनच दीपावलीतील प्रत्येक दिवा आपल्याला अधिक चांगला माणूस बनण्याची प्रेरणा देणारा असावा. घरातील दिवे काही काळासाठी उजेड देतात; परंतु सदाचार, प्रेम आणि मानवतेचा प्रकाश संपूर्ण जीवन उजळवू शकतो.

लक्ष्मी पूजन हा केवळ धन, सोने-चांदी किंवा भौतिक संपत्तीची प्राप्ती करण्याचा धार्मिक विधी नाही; तर तो जीवनातील सुख, समाधान, शांती, सदाचार आणि सर्वांगीण समृद्धीचा मंगलमय संदेश देणारा उत्सव आहे. खरी लक्ष्मी केवळ तिजोरीत नसते, तर ती कुटुंबातील प्रेमात, मनातील समाधानात, श्रमातून मिळालेल्या प्रामाणिक यशात आणि समाजातील सौहार्दातही वसलेली असते.

आजच्या काळात समृद्धीचा विचार करताना पर्यावरणाचे महत्त्वही समजून घेणे आवश्यक आहे. निसर्गाचा अतिरेकाने वापर करून मिळविलेली आर्थिक प्रगती दीर्घकाळ टिकू शकत नाही. शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, हिरवीगार पृथ्वी आणि निरोगी पर्यावरण ही भविष्यातील पिढ्यांसाठीची सर्वात मोठी संपत्ती आहे. त्यामुळे दीपावली आणि लक्ष्मी पूजन साजरे करताना पर्यावरणपूरक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. अनावश्यक प्रदूषण टाळणे, ऊर्जा बचत करणे, स्वच्छतेचे भान राखणे आणि निसर्गाशी सुसंवाद साधणे, हेसुद्धा खऱ्या अर्थाने समृद्धीच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे.

आपण आपल्या घरात लक्ष्मीचे स्वागत करतो, त्याचप्रमाणे पृथ्वीचे आणि निसर्गाचे रक्षण करण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे.

आजच्या भौतिकतावादी आणि स्पर्धात्मक जीवनात लक्ष्मी पूजनाचा व्यापक अर्थ समजून घेणे अधिक आवश्यक आहे. संपत्ती मिळविण्यासोबत तिचा सदुपयोग करणे, प्रामाणिकपणे उपार्जन करणे, गरजूंच्या जीवनात मदतीचा प्रकाश निर्माण करणे आणि निसर्ग व समाजाशी सुसंवाद साधणे. यातूनच समृद्धीला खरा अर्थ प्राप्त होतो.

म्हणूनच लक्ष्मी पूजनाच्या दिवशी आपण केवळ घरात दिवे लावून अंधार दूर करण्याची प्रार्थना न करता, लोभ, मत्सर, अन्याय आणि असंतोषाचा अंधार दूर करून ज्ञान, सद्भावना, समाधान आणि मानवतेचा प्रकाश जीवनात प्रज्वलित करण्याचा संकल्प केला पाहिजे. हाच धनापलीकडील सुख, शांती आणि समृद्धीचा खरा अर्थ असून, हाच लक्ष्मी पूजनाचा शाश्वत आणि मंगलमय संदेश आहे.

- ९५६१५९४३०६

लढवय्या मोहम्मद शफीने कसोटी कारकिर्द थांबवली!

डॉ.दत्ता विघावे क्रिकेट समिक्षक

भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने शुक्रवारी इंस्टाग्रामवर एका व्हिडिओ पोस्टद्वारे ही घोषणा केली. विशेष म्हणजे, १३ वर्षांपूर्वी ६ नोव्हेंबर रोजी त्याने वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी पदार्पण केले होते आणि त्याच दिवशी तो निवृत्त झाला. त्याने ६४ सामन्यांमध्ये २२९ बळी घेतले होते. मात्र, तो एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेट खेळणे सुरू ठेवणार आहे.

३६ वर्षीय शमीने लिहिले, "आज, जड अंतःकरणाने आणि असंख्य सुंदर आठवणींसह, मी कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेत आहे." जेव्हा मी पहिल्यांदा भारतीय कसोटी जर्सी घातली, तेव्हा माझे एकच स्वप्न होते: माझ्या देशासाठी काहीतरी करणे. प्रत्येक बळी, संघर्ष, दुखापत आणि पुनरागमनाने मला काहीतरी शिकवले. तो म्हणाला, "मी पांढरी जर्सी सोडत आहे, क्रिकेट नाही."

शमीने स्पष्ट केले की तो आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटसह व्हाईट-बॉल फॉरमॅट खेळणे सुरू ठेवेल. गरज पडल्यास, तो आपली तंदुरुस्ती टिकवण्यासाठी चार दिवसीय प्रथम-श्रेणी सामने खेळू शकतो, पण भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळणार नाही. तो म्हणाला, "कसोटी क्रिकेट माझ्यासाठी केवळ एक प्रकार नाही; तो माझ्या आयुष्याचा एक खूप खास भाग राहिला आहे. मी माझा शेवटचा कसोटी चेंडू मैदानावर टाकला असेल, पण भारतासाठी खेळण्याचा अभिमान माझ्या हृदयात कायम राहील."

शमीने आपल्या पदार्पणाच्या सामन्यात ९ बळी घेतले

शमीने ६ नोव्हेंबर २०१३ रोजी कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर वेस्ट इंडिजविरुद्ध आपला पहिला कसोटी सामना खेळला. त्याने आपल्या पदार्पणाच्या सामन्यात एकूण ९ बळी घेतले. त्याने एका डावात सहा वेळा ५ किंवा त्याहून अधिक बळी घेतले. एका डावातील त्याची सर्वोत्तम कामगिरी ५६ धावांत ६ बळी ही होती. एकूण कसोटी बळींच्या बाबतीत, तो भारतीय गोलंदाजांमध्ये १२ व्या आणि वेगवान गोलंदाजांमध्ये सहाव्या क्रमांकावर आहे.

विश्वचषकानंतर दुखापतींशी झुंज दिल्याने तो संघात परतला नाही

२०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात शमी भारताच्या सर्वात यशस्वी गोलंदाजांपैकी एक होता. त्यानंतर, घोट्याच्या दुखापतीमुळे त्याला शस्त्रक्रिया करावी लागली. गुडघ्याच्या समस्यांमुळेही त्याच्या पुनरागमनास विलंब झाला. जानेवारी २०२५ मध्ये, त्याने टी-२० क्रिकेटमध्ये आंतरराष्ट्रीय पुनरागमन केले आणि चॅम्पियन्स ट्रॉफी संघात त्याची निवड झाली. न्यूझीलंडविरुद्धचा अंतिम सामना हा त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना होता. मोहम्मद शमीने २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात ७ सामन्यांमध्ये २४ बळी घेतले. यानंतर तो कोणत्याही फॉरमॅटमध्ये भारतीय संघाकडून खेळला नाही, पण बंगालकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणे सुरू ठेवले. त्याने नुकत्याच झालेल्या रणजी ट्रॉफीच्या सलामीच्या सामन्यात दिल्लीविरुद्ध ५ बळीही घेतले.

असे असूनही, न्यूझीलंड दौऱ्यापूर्वीच्या चार दिवसीय सामन्यांसाठी त्याला भारत 'अ' संघात स्थान देण्यात आले नाही. वरिष्ठ संघाच्या कसोटी योजनांमध्येही त्याचा समावेश नव्हता.

मोहम्मद शमी रणजी ट्रॉफीमध्ये बंगालकडून खेळतो

निवृत्तीच्या सुमारे दोन आठवड्यांपूर्वी, शमीने बंगालकडून खेळताना आपल्या तंदुरुस्तीबद्दलचे प्रश्न फेटाळून लावले होते. तो म्हणाला, "मी सध्या माज्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये आहे. यात आडवळणाने बोलण्याची गरज नाही."

शमीचा गावापासून ते भारतीय संघापर्यंतचा प्रवास

मोहम्मद शमीचा जन्म ३ सप्टेंबर १९९० रोजी उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील सहसपूर अलीनगर गावात झाला. त्याचे वडील, तौसीफ अली, एक शेतकरी आणि स्वतः एक वेगवान गोलंदाज होते. त्यांनी आपल्या मुलाची प्रतिभा ओळखली आणि त्याला क्रिकेट प्रशिक्षणासाठी मोरादाबादचे प्रशिक्षक बदरुद्दीन सिद्दिकी यांच्याकडे पाठवले. उत्तर प्रदेशच्या १९ वर्षांखालील संघात स्थान मिळवण्यात अपयशी ठरल्यानंतर, शमी प्रशिक्षकाच्या सल्ल्यानुसार कोलकाताला गेला. तिथे त्याने क्लब क्रिकेट खेळून बंगाल संघात स्थान मिळवले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपल्या वेगवान गोलंदाजीने नावलौकिक मिळवल्यानंतर, त्याला २०१३ मध्ये भारतीय संघात बोलावण्यात आले.

आयपीएलमध्येही शमीचा ठसा

शमीने आयपीएलमध्येही आपली छाप सोडली. २०२३ च्या हंगामात गुजरात टायटन्सकडून खेळताना, शमीने १७ सामन्यांमध्ये २८ बळी घेत पर्पल कॅप जिंकली. पर्पल कॅप हा पुरस्कार आयपीएलच्या एका हंगामात सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजाला दिला जातो.

मोहम्मद शमी भारतातफें कसोटी क्रिकेटमध्ये वेगवान गोलंदाजांत सर्वाधिक बळी घेणाऱ्यात सहाव्या क्रमांकावर आहे. त्याच्यापूर्वी कपिलदेव, झहीरखान, ईशांत शर्मा, जवागल श्रीनाथ व जसप्रित बुमराहा यांचा क्रम लागतो.

वनडे विश्वचषकात भारतातफें दोन हॅट्रीक झाल्या आहेत. त्यातील पहिली हॅट्रीक १९८७ मध्ये चेतन शर्माच्या नावे न्यूझीलंडविरुद्ध नोंदली आहे तर सन २०१९ च्या विश्वचषकात शमीने अफगाणिस्तान विरुद्ध एका फसलेल्या सामन्यात हि कामगिरी नोंदवली होती.

तसं बघाल तर मोहम्मद शमीचं संपूर्ण जीवनच संघर्षमय राहिलं. कौटुंबिक आयुष्यातील ताणतणाव त्याने कधीही मैदानावरच्या कामगिरीवर होऊ दिले नाही. मात्र तेथे त्याला दुखापतींनी फार सतावले शिवाय निवड समितीची वक्रदृष्टी त्याच्यावर जरा जास्तच होती. तरी भारतीय संघात परतण्याचे न त्याने सोडले नाही. मात्र कसोटी संघात मिळण्याचे सर्व दरवाजे बंद झाल्याचे संकेत मिळताच त्याने कसोटी क्रिकेटमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र वनडे व टि २० क्रिकेटमध्ये तो खेळणार असून आगामी दक्षिण आफ्रिकेतील वनडे विश्वचषक स्पर्धेत त्याच्या समावेशाचे सुतोवाच मिळत आहेत.

- ९०९६३७२०८२

स्वच्छता ज्या घरी, लक्ष्मी तेथे वास करी

कृष्णकुमार निकोडे गडचिरोली

हिंदू धर्मात लक्ष्मीपूजन हा दिवाळीतील सर्वात महत्त्वाचा आणि पवित्र सण मानला जातो. हा सण अश्विन महिन्याच्या अमावस्येला- प्रदोष काळात साजरा केला जातो. यालाच खरी दिवाळी म्हटले जाते. लक्ष्मीपूजन ही भारतीय संस्कृतीतील वैशिष्ट्यपूर्ण पूजा आहे. लक्ष्मी ही समृद्धीची देवी आणि वैष्णवांची सर्वोच्च देवी यांच्या पूजेसाठी हा एक हिंदू प्रसंग आहे. आश्विन महिन्यातील अमावास्येला संध्याकाळी ही पूजा प्रतिवर्षी केली जाते.

लक्ष्मीपूजनाचे महत्त्वः सुख-समृद्धीः घरात सुख, शांती, संपत्ती आणि ऐश्वर्य नांदावे यासाठी माता लक्ष्मीची पूजा केली जाते. भगवान विष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले होते, अशी धार्मिक मान्यता आहे. व्यवसाय व लेखाजोखाः व्यापारी वर्गात या दिवशी नवीन वर्षाचे हिशोबाचे वही-खाते पूजन केले जाते.

पूजेसाठी आवश्यक साहित्यः (१) देवी लक्ष्मी आणि भगवान गणेशाची मूर्ती किंवा फोटो. (२) चौरंग किंवा पाट आणि त्यावर अंथरण्यासाठी लाल किंवा पिवळे वस्त्र. (३) तांब्याचा किंवा पितळेचा कलश, पाणी, गंगाजल, आंबा/विड्याची पाने आणि नारळ. (४) हळद, कुंकू, अक्षता (तांदूळ), फुले, हार, अगरबत्ती, दिवा, तूप किंवा तेल. (५) नैवेद्य- साळीच्या लाह्या, बत्तासे, मिठाई, फळे, खवा. (६) सोन्याचे दागिने, चांदीचे नाणे, चलनी नोटा आणि नवीन हिशोबाची वही.

पूजनाची विधी आणि मांडणीः सफाई आणि सजावटः घराची स्वच्छता करून मुख्य प्रवेशद्वारावर रांगोळी काढावी आणि आंब्याच्या पानांचे तोरण लावावे. चौरंग मांडणीः पाटावर लाल वस्त्र अंथरावे. त्यावर अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढून माता लक्ष्मीची स्थापना करावी. लक्ष्मीच्या उजव्या बाजूला गणपतीची स्थापना करावी.



कलश स्थापनाः तांब्यात पाणी, गंगाजल, सुपारी आणि सिक्का टाकून त्यावर आंबा/विड्याची पाने आणि नारळ ठेवावा.

पूजन विधीः सर्वप्रथम आचमन व संकल्प करावा. प्रथम भगवान गणेशाची पूजा करावी. त्यानंतर माता लक्ष्मी, कुबेर आणि ठेवी/वही-खात्यांचे पूजन करावे. हळद, कुंकू, अक्षता, फुले वाहून मंत्राचा जप करावा मंत्र- "ॐ महालक्ष्म्यै नमः"

आरती व नैवेद्यः लाह्या-बत्तासे आणि गोडाचा नैवेद्य दाखवून मनोभावे आरती करावी. रात्रभर अखंड दिवा तेवत ठेवावा. अधिक माहितीसाठी आपण विकिपीडिया लक्ष्मीपूजन किंवा संत साहित्य माहिती पाहू शकता. लक्ष्मीपूजन ही भारतीय संस्कृतीतील वैशिष्ट्यपूर्ण पूजा आहे. लक्ष्मी ही समृद्धीची देवी आणि वैष्णवांची सर्वोच्च देवी यांच्या पूजेसाठी हा एक हिंदू प्रसंग आहे. आश्विन महिन्यातील अमावास्येला संध्याकाळी ही पूजा प्रतिवर्षी केली जाते. दिवाळीमध्ये लक्ष्मी पूजनाला अधिक महत्त्व दिले जाते.

दिवाळी लक्ष्मीपूजनः सुट्टी, उत्सव, सार्वजनिक सुट्टी

आश्विन पौर्णिमेला प्रामुख्याने दिली जाते. कर्मचाऱ्यांना या सणानिमित्त बोणस आणि मासिक वेतन सणापूर्वी अदा केले जाते. केरसुणी पूजा- दिवाळीच्या अमावास्येला केरसुणी पूजन केले जाते. घरातून दारिद्र, अलक्ष्मी घालवून टाकणारी केरसुणी ही देवी स्वरूप मानली जाते म्हणून या दिवशी तिचे महत्व विशेष आहे. अश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जेथे चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त आणि क्षमाशील पुरुष आणि गुणवती आणि पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते, अशी आख्यायिका आहे. समृद्धी आणि ऐश्वर्य यांचे प्रतीक असलेल्या लक्ष्मीची पूजा या रात्री केली जाते.

श्री लक्ष्मीपूजनाच्या वेळी अक्षतांनी बनवलेले अष्टदल कमल किंवा स्वस्तिक यांवरच श्री लक्ष्मीची स्थापना केली जाते. त्यानंतर आदी देवतांना लवंग, वेलची आणि साखर घालून तयार केलेल्या गायीच्या दुधाच्या खव्याचा नैवेद्य दाखवतात. धने, गूळ, साळीच्या लाह्या, बत्तासे इत्यादी पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते आप्तेष्टांना वाटतात. याखेरीज चलनी नोटा, नाणी, सोन्याचे अलंकार यांचीही पूजा यावेळी केली जाते. व्यापारी वर्गात यापूजेच्या वेळी फटाके उडवून आनंद साजरा केला जातो. दिवाळीतील लक्ष्मी पूजनः भेंड-बत्तासे कथा- लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले अशी कथा आहे. पौराणिक साहित्यात लक्ष्मी ही विष्णूची पत्नी मानली गेली आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी! लक्ष्मी पूजनाच्या सर्वांना हार्दिक

- ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)


दिवाळी, भाऊबिज व नववर्षाच्या
राजेश खंगारे


ना. सुनिलबाबू केदार
शाहरूख साबीर शेख
दिवाळी, भाऊबिज व नववर्षाच्या


ना. सुनिलबाबू केदार
गोविंदा भाऊ ठाकरे
दिवाळी, भाऊबिज व नववर्षाच्या


ना. सुनिलबाबू केदार
प्रकाश पराते
दिवाळी, भाऊबिज व नववर्षाच्या


विनोद जैन
दिवाळी, भाऊबिज व नववर्षाच्या


डॉ. निलेश कुंभारे
कुंभारे चिल्ड्रन हॉस्पिटल
दिवाळी, भाऊबिज व नववर्षाच्या
डॉ. सोनाली कुंभारे


सुखकर्ता हॉस्पीटल
दिवाळी, भाऊबिज,कार्तिक पौर्णिमा
तसेच नववर्षाच्या


भुडे नर्सिंग होम
अण्ड मॅटर्नीटी हॉस्पीटल
दिवाळी, भाऊबीज तसेच नववर्षाच्या
डॉ. स्मिता सतीश भुडे


जे.जे. हॉस्पीटल
दिवाळी, भाऊबिज,व नववर्षाच्या


राजुभाऊ कांबे
कांबे बाईल्ड केअर क्लिनिक अॅण्ड
मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल
डॉ. स्वप्नील राजु कांबे,
दिवाळी, भाऊबिज व नववर्षाच्या


डॉ. परेश झोपे
अभेय मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल
दिवाळी, भाऊबिज, कार्तिक पौर्णिमा
तसेच नववर्षाच्या


आस्था
पॅथालाजी लेबोरटरी सावनेर
दिवाळी, भाऊबिज
व नववर्षाच्या


SHUBH Deepavali
आदित्य हॉस्पीटल
रेल्वे स्टेशन रोड, सावनेर
दिवाळी, भाऊबिज, कार्तिक पौर्णिमा तसेच नववर्षाच्या


पुण्यानी हॉस्पीटल
दिवाळी, भाऊबिज,
कार्तिक पौर्णिमातसेच
नववर्षाच्या


तनुश्री नर्सिंग होम सावनेर
दिवाळी, भाऊबिज व नववर्षाच्या
डॉ. विजय घोटे
व ज्योत्स्ना घोटे


हितेश बननोड व ज्योतीताई बननोड
दिवाळी, भाऊबिज
व नुतनवर्षाच्या


दिवाळी व भाऊबीज
निमित्त सर्व नागरीकांना
हार्दिक शुभेच्छा
सौ. संजना मंदार मंगळे


दिवाळी, भाऊबीज
निमित्त सावनेर शहर वासियांना
हार्दिक शुभेच्छा


सावनेर विधानसभा क्षेत्राचे लाडके
आमदार आशिषराव देशमुख
मा. मनोहरजी कुंभारे
दिवाळी, भाऊबिज
व नुतनवर्षाच्या


बारई ज्वेलर्स
दिवाळी, भाऊबिज, कार्तिक पौर्णिमा
तसेच नववर्षाच्या


जे एस फीटनेस क्लब
दिवाळी, भाऊ बिज व नववर्षाच्या


दिवाळी, भाऊबिज, कार्तिक पौर्णिमा
तसेच नववर्षाच्या


दिवाळी, भाऊबिज व
नववर्षाच्या
:: शुभेच्छुक ::
साजिद शेख व
अमोल बोन्द्रे
व मित्र परिवार


योग परिवार सावनेर तर्फे समस्त शहरवासीयांना
दिवाळी ,भाऊबीज, कार्तिक
पोर्णिमेच्या
खुप खुप शुभेच्छा
स्वस्थ रहा, निरोगी रहा


दिवाळी, भाऊबिज व
नववर्षाच्या
मनोजभाऊ बसवार
व मित्र परिवार


दिलीपभाऊ घटे तर्फे समस्त
शहरवासीयांना दिवाळी व
नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा


JSK
सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल
दिवाळी, भाऊबीज व नुतन वर्षाच्या


दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!
दिवाळीच्या
मंगलमय शुभेच्छा!
अॅड.अरविंद लोधी


रेखाताई पोटभरे
भारतीय जनता पार्टी
दिवाळी, भाऊबिज,
कार्तिक पौर्णिमा तसेच नववर्षाच्या
निखिल पोटभरे


मा. आत्मारामजी कमाले
KIDZEE PRE SCHOOL SAONER
दिवाळी, भाऊबिज व नुतनवर्षाच्या
सुनील आत्माराम कमाले


धनतेरस दिवाळी निमित्ताने
चौंगरे ज्वेलर्स
आम्ही प्रतिष्ठान
चौंगरे ज्वेलर्स


युवा व्यवसायी
संदिप सावल व बिल्लु अकोने
व मित्र परिवारातर्फे
दिवाळी, भाऊबिज
व नुतनवर्षाच्या
शुभेच्छक : सानवी मोबाईल शॉपी, सावनेर


श्री सच्चिदानंद
स्टेशनरी अॅन्ड प्रिन्टर्स, सावनेर
रोटा, स्किन, ऑफसेट प्रिंटिंग
XEROX
BANNER
LEMINATION
I-CARD
STAMP
BINDING
दिवाळी, भाऊबीज व नववर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा...!


संकलनकर्ता
किशोर ढुंढेले, सावनेर

शब्दवेली

'दीपरंग' विशेष

दैनिक
सिंहवाणी वृत्त

४ दिनांक : रविवार, ८ नोव्हेंबर २०२६

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

Epaper : epaper.sinhvani.com

आपुलकीने दिवाळी साजरी करुया...!

विशाल देवतळे
हिंगणा, जि. नागपूर

आपल्या भारत देशातील सर्वात मोठा सण म्हणजे 'दिवाळी' होय. दिवाळी म्हणजे दिव्यांची रांग, पणत्यांची रांग. अशी दिवे जे घरातल्या अडी अडचणींच्या, अडगळीच्या अंधाराला दूर सारून सुख समृद्धीच्या उजेडास सभेवताल पसरून चैतन्याचे वातावरण प्रत्येकाच्या मनात निर्माण करणे होय. आपुलकीने आपुलकीला मनापासून जपणाऱ्या पावन संकल्पनेतील हा आपल्या भारतातील सर्वात मोठा सण संपूर्ण भारत देशाचे अभिमान आहे. दिवाळी या सणाकडे आपण विजयाच्या, समृद्धीच्या प्रतिकात्मक दृष्टीने पाहतो म्हणजेच अंधारावर प्रकाशाचा, अज्ञानावर ज्ञानाचा, अन्यायावर न्यायाचा आणि वाईटांवर चांगल्याचा विजयाचे प्रतीक म्हणून या दिवाळी सणांचे अनन्यसाधारण महत्त्व संपूर्ण विश्वाच्या पटलावरती दिसून येते.

पौराणिक कथेनुसार भगवान श्रीराम आपल्या पत्नी व भावासह जेव्हा लंकाधिश रावणावर विजय संपादित करून अयोध्येत परतले त्या विजयाचा आनंद उत्सव म्हणून अयोध्येतील नागरिकांनी घराघरात, रस्त्या रस्त्यावर दिव्यांची आरास अभिमानाने आणि आनंदाने उजळली होती. या विजयाचे प्रतीक म्हणून आजही संपूर्ण देश दिव्यांची आरास आपल्या दारासमोर मोठ्या उत्सुकतेने आनंदाने लावतो. जे नव्या युगाचे चाहूल देऊन केवळ चाहूलच देऊन जाते असे नाही तर सौख्याचे दान ओंजळीत भरुन जाते.हे खरंच अभिमानास्पद असेच आहे..!

परंतु आज आपण सर्व एकविसाव्या शतकामध्ये जीवन जगत आहोत आपल्या देशाने विज्ञानाच्या आधारावर विविध क्षेत्रात विविध प्रांतात गरुड झेप घेतलेली आहे. इतके असतानाही या दिवाळीच्या ममाँची,अथार्ची आपल्याला स्वयं सिद्धता दिसून येते का? देशात सुरू असणाऱ्या गैरजबाबदार अंधाराला जबाबदारीच्या उजेडाने दूर सारले आहे का? समाजातील तळागाळात राहणाऱ्या गोरगरीबांच्या हितांच्या रक्षणासाठी सामाजिक कार्यकर्ते राजकारणी किंबहुना एक



नागरिक या नात्याने आपण स्वतः तरी प्रयत्नांच्या उजेडाच्या पणत्या अशा ठिकाणी उजळण्यासाठी सरसावतो का? समाजामध्ये पसरणारे अंधश्रद्धेच्या रूपातले अज्ञान आणि अंधश्रद्धेला प्रत्येक जनसामान्यांच्या मनातून, विचारातून, रूढी परंपरेतून मिळवलेल्या ज्ञानाच्या साह्याने दूर साकारू शकलो का? यासोबतच देशाच्या विविध राज्यात, भागात अनेक ठिकाणी वाईट, अनिष्ट गोष्टी घडताना दिसून येते तेव्हा आपण वाईटांवर चांगल्याचा नक्कीच विजय झाला असे म्हणू शकतो का? देशाचं सोडा आपण ज्या परिसरात राहतो त्या परिसरात घडणाऱ्या माणूसकीच्या विपरीत अनिष्ट कृतींवर आपल्या सज्ञानाने आळा घालण्याचा प्रयास तरी केला का? याचा एक नागरिक या नात्याने आपण सर्वांनी जरूर विचार करायला पाहिजे.

जर या विचारांती आपल्या मनाला समाधान प्राप्त होत असेल की,"होय खरंच आम्ही या दिवाळीच्या तात्विक अर्थाला समजून घेऊन त्याला मनापासून आपल्या आचरणामध्ये, व्यवहारांमध्ये, विचारांमध्ये स्वीकारले आहे तेव्हाच कुठे आपण सर्वांनी दिवाळी सारखा हा अभिमान सोहळा उत्साहाने साजरा करायला पाहिजे. अन्यथा एक माणूस म्हणून विचार करणे तितकेच गरजेचे आहे.

आज आपण महाराष्ट्र राज्याचा विचार केल्यास राज्यामध्ये होत असणाऱ्या अनेक क्षेत्रातील अडीअडचणी कुठे शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या हमीभावाची अडचण दिसून येते! कुठे शिक्षकांच्या, इतर कर्मचाऱ्यांच्या पगाराची गैरसोय दिसून येते तर कुठे वेगवेगळे कारण, ध्येये धोरणे गोरगरिबांच्या हितांना पायदळी तोडण्यासाठी उद्धवलेले दिसून येतात मग वासारख्या पसरणाऱ्या अंधाराचर राजकीय पक्षांनी, सत्ताधारांनी खरंच आपल्या ज्ञानाच्या आधारावर आपल्या हितकारक धोरणांच्या आधारावर या सर्व अंधारांना दूर सारले आहेत काय? याचा जरूर विचार करावा. आजही शेतकरी आपल्या शेतमालाच्या भावासाठी, शेतमालाच्या विक्रीच्या चिंतेने ग्रस्त आहेत अजूनही राज्याच्या कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. यासोबतच विनाअनुदानित अंशतः अनुदानित शिक्षकांच्या पगारांचे चक्र अजूनही रखडलेलेच आहेत. मग अशा लोकांच्या घरात अंधार घट्ट होत असताना आपण दिवाळीचे दिवे लावणे कितपत योग्य आहे. याचा एक सत्ताधारी एक लोकप्रतिनिधी या नात्याने प्रत्येक राजकारण्यांनी विचार करणे तितकेच गरजेचे आहेत. आपल्या एका चुकीच्या धोरणामुळे लाखो लोकांच्या घरात अंधाराचे साम्राज्य घट्ट झालेले दिसत असताना सुखाने दिवाळी साजरी करणाऱ्या नेत्यांना संकोच वाटायला पाहिजे.

आज बरेचदा गैरविचारी लोकनेते जे मनात येतील ते बोलून समाज बांधवांना, समाज घडविणाऱ्या मनांना दुखवण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करतात मग याला कुठे अन्यायावर न्यायाचा विजय म्हणता येईल का? दिवाळी सारखा सण खरंच साजरा करण्याचे साफल्य आपल्याला मिळत आहे का? याचा जरूर विचार व्हायला पाहिजे.

एक देशाचा नागरिक या नात्याने प्रत्येकाच्या घरात आनंदाच्या, अभिमानाच्या पणत्या उजळल्या गेली पाहिजे याचा विचार करताना आपण मोठ्या मॉल मधून शोरूम मधून दिवाळीची खरेदी करतो परंतु रस्त्याच्या बाजूला बसणाऱ्या एखाद्या गरीबाच्या छोट्याशा दुकानातून देन दिवे घेताना भावबाजीचा प्रयत्न करतो हे किती पद योग्य वाटते याचा जरूर विचार करायला पाहिजे. गरिबांच्या उंबरठ्यावर आपण आपल्या ज्ञानाचा उर्मटपणा दाखवतो. परंतु तेच मोठमोठ्या मॉलमध्ये लागलेल्या किमतीच्या चिठ्ठ्यांना पाहूनही आपण मुकाट्याने त्याची किंमत देतो. ह्या आपल्या समजुतदारीच्या तफावतीमुळे आपण कुठे दिवाळी साकारतो अनं कुठे अंधाराला अंधारातच ठेवतोय. विचारांच्या कप्पात उमजून घेणे आवश्यक आहे.

तेव्हा माझ्या बांधवांनो प्रत्येकाच्या घरात, प्रत्येकाच्या मनात आनंदाचे अभिमानाचे आणि सुखाचे दिवे उजळले जावो यासाठी आपल्या सभोवताली असणाऱ्या गरजू समाजबांधवांच्या हितांचा, भावनेचा, गरजांचा विचार करुन दिवाळी सणांच्या वास्तव मर्माला माणूस म्हणून आत्मसात करून घेऊयात. रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या गोरगरिबांच्या दुकानातून खरेदी करून एक माणुसकीचा आधार त्यांनाही जगण्यासाठी देऊयात..! "श्रीमंतांच्या दिवाळीसाठी साधन होण्यापेक्षा आपल्या आजूबाजूच्या लोकांच्या आनंदाचे, सुखाचे छोटेसे निमित्त होणेच वास्तव दिवाळी आहे..!" मोठमोठ्या गोड पदार्थांची पाकीटे वाटण्यापेक्षा एकमेकांना आधारभूत ठरणारी आपुलकी जिव्हाळ्याची हिम्मत व सहकार्याची सहानुभूतीची शिदोरी वाटा..! सोबतच गोरगरिबांच्या विकासासाठी उत्कर्षासाठी आपल्या परीने जे जे करता येईल त्यांच्या उंबरठ्यावर दार ठोठावणाऱ्या अडचणींना दूर करण्यासाठी जे प्रयत्न करता येईल ते जरूर करायला पाहिजे. तेव्हाच कुठे आपण खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी केली असे म्हणता येईल. तेव्हा मित्रांनो...

चला दीप लावू आपुलकीने,
प्रत्येकाच्या अंतराळी..
अनं समाधानाने उजळून आणू,
आपल्या सर्वांची दिवाळी..

- ९७६४९१५१७५

'दिव्यांच्या रोषणाईपेक्षा माणुसकीचा प्रकाश अधिक महत्त्वाचा!'

कमल संतोष थोरात
आंबेगाव, जि. पुणे

दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, फराळाची मेजवानी आणि खरेदीचा उत्साह नव्हे; तर माणसामाणसांतील नात्यांना उजाळा देणारा, मनातील अंधार दूर करणारा आणि समाजात आनंदाची पेरणी करणारा संस्कृतीचा उत्सव आहे. वर्षभराच्या धकाधकीनंतर येणारा हा सण प्रत्येकाच्या मनात नवी उमेद निर्माण करतो. घराची स्वच्छता, अंगणातील रांगोळी, दारात लटकणारा आकाशकंदील, पणत्यांची आरास आणि नातेवाइकांच्या भेटीगाठी यांमधून दिवाळीचे मांगल्य अनुभवायला मिळते. मात्र, बदलत्या जीवनशैलीत दिवाळी साजरी करण्याच्या पद्धतीतही बदल होत आहेत. उत्सवाचा आनंद घेताना त्यामागील सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय मूल्यांचा विसर पडता कामा नये.

आज दिवाळीचे स्वरूप काही प्रमाणात खर्च, प्रतिष्ठा आणि दिखाव्याच्या स्पर्धेत अडकताना दिसते. महागड्या वस्तूंची खरेदी,भरमसाट आतषबाजी, सजावटीवर होणारा अनावश्यक खर्च आणि सोशल मीडियावरील प्रदर्शन यांमध्ये सणाचा मूळ हेतू हरवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.खरे तर दिवाळी हा स्वतःच्या श्रीमंतीचे प्रदर्शन करण्याचा नव्हे, तर आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याचा सण आहे. आपल्या घरातील प्रकाश शेजारच्या घरापर्यंत पोहोचला, तरच दीपोत्सवाचे खरे सार्थक होईल.

दिवाळीची सुट्टी ही मुलांसाठी आनंदासोबतच संस्कारांची शिदोरी मिळविण्याची संधी असते. पालकांनी मुलांना केवळ नवीन कपडे, मिठाई आणि फटाके यापुरते दिवाळीचे महत्त्व मर्यादित ठेवू नये. दिवाळीचा इतिहास, परंपरा आणि सांस्कृतिक महत्त्व सांगावे. मातीच्या पणत्या रंगविणे, स्वतःच्या हाताने आकाशकंदील तयार करणे, रांगोळी काढणे, किल्ले बनविणे अशा उपक्रमांतून मुलांच्या सर्जनशीलतेला वाव द्यावा.

मोबाईल आणि दूरचित्रवाणीच्या पडद्यापलीकडेही एक सुंदर जग आहे, याची जाणीव मुलांना करून द्यावी. गोष्टींची पुस्तके वाचणे, मैदानी खेळ खेळणे, निसर्गभ्रमंती करणे आणि कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींकडून अनुभव ऐकणे यासाठी वेळ द्यावा. विशेष म्हणजे, आपल्याकडे असलेल्या वस्तूंचे मोल आणि दुसऱ्यांच्या गरजांची जाणीव मुलांमध्ये निर्माण



करावी. गरजू मित्राला शैक्षणिक साहित्य देणे, एखाद्या वंचित मुलासोबत फराळ वाटून खाणे किंवा वृद्धाश्रमातील आजी-आजोबांची भेट घेणे, हे संस्कार मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला समृद्ध करणारे ठरतात.

दिवाळीच्या आनंदात फटाक्यांची आतषबाजी केली जाते; मात्र त्यातून निर्माण होणारे ध्वनिप्रदूषण आणि वायुप्रदूषण ही चिंतेची बाब आहे. फटाक्यांचा मोठा आवाज लहान मुले,ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि पशुपक्ष्यांसाठी त्रासदायक ठरतो. त्याचबरोबर हवेतील धुरामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे फटाक्यांचा वापर टाळणे किंवा अत्यंत मर्यादित ठेवणे ही काळाची गरज आहे.पर्यावरणपूरक दिवाळीसाठी मातीच्या पणत्यांना प्राधान्य द्यावे. स्थानिक कुंभार बांधव,महिला बचतगट आणि छोट्या व्यावसायिकांकडून वस्तूंची खरेदी करावी. यामुळे दिवाळीच्या आनंदासोबत स्थानिक अर्थव्यवस्थेलाही हातभार लागतो. प्लास्टिकच्या सजावटीऐवजी नैसर्गिक आणि पुनर्वापर करता येणारया वस्तूंचा वापर करावा. दिवाळीनंतर रस्त्यांवर आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा साचणार नाही, याची प्रत्येकाने जबाबदारी घ्यावी.

समाजात अनेक कुटुंबे अशी आहेत की, ज्यांच्यासाठी दोन वेळचे अन्न मिळविणे हेच मोठे आव्हान असते. कुणाच्या घरात आजारपण, कुणाच्या घरात बेरोजगारी, तर कुणाच्या आयुष्यात परिस्थितीने निर्माण केलेली आर्थिक ओढाताण असते. अशा परिस्थितीत आपण लाखो रुपयांची खरेदी करून सण साजरा करत असताना त्यांच्या आयुष्यातही आनंद निर्माण करण्याचा विचार करणे आवश्यक आहे. गरजू कुटुंबांना धान्य, कपडे, मिठाई आणि जीवनावश्यक वस्तू देणे, अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी करणे, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना भेटवस्तू देणे अशा छोट्या कृतींतून मोठा सामाजिक संदेश देता येतो. सफाई कर्मचारी, कष्टकरी, शेतमजूर, बांधकाम कामगार आणि सुरक्षा रक्षक यांच्या योगदानाची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करावी.समाजातील प्रत्येक घटकाला सणाचा आनंद अनुभवता यावा, यासाठी सामूहिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.

दिवाळी हा नाती जपण्याचा आणि माणसे जोडण्याचा सण आहे. वर्षभरातील धावपळीत अनेकदा संवाद कमी होतो, गैरसमज वाढतात आणि नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. दिवाळीच्या निमित्ताने जुने मतभेद विसरून एकमेकांची भेट घ्यावी.राग, द्वेष आणि अहंकार बाजूला ठेवून संवादाची नवी सुरुवात करावी. केवळ महागड्या भेटवस्तू देण्यापेक्षा प्रेमाचे दोन शब्द, आपुलकीची विचारपूस आणि वेळ देणे अधिक मोलाचे ठरते.कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान, लहानांशी प्रेमळ संवाद आणि शेजाऱ्यांशी सलोख्याचे संबंध यांतून समाजातील बंधुभाव अधिक दृढ होतो. जात, धर्म, भाषा आणि आर्थिक परिस्थिती यांपलीकडे जाऊन माणूस म्हणून एकमेकांना स्वीकारण्याची शिकवण दिवाळीने द्यायला हवी.

दिवाळीचा खरा अर्थ केवळ बाहेरील अंधार दूर करण्यात नाही, तर मनातील स्वार्थ, द्वेष, मत्सर आणि असंवेदनशीलतेचा अंधार दूर करण्यात आहे. आज समाजाला केवळ रोषणाईची नव्हे, तर माणुसकीच्या प्रकाशाची अधिक गरज आहे. प्रत्येकाने आपल्या परीने एक तरी सामाजिक उपक्रम हाती घेतला, तर दिवाळीचा उत्सव समाजपरिवर्तनाचे माध्यम बनू शकतो. शाळांनी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सणांची जाणीव निर्माण करावी. पालकांनी स्वतःच्या आचरणातून मुलांसमोर आदर्श ठेवावा. नागरिकांनी स्वच्छता, सामाजिक समता, गरजूंना मदत आणि निसर्गसंवर्धन यांचा संकल्प करावा. सण साजरा करताना आनंदाबरोबर जबाबदारीची जाणीव ठेवणे, हीच आधुनिक काळातील खरी संस्कृती ठरावी.

शेवटी, घरात किती दिवे लावले यापेक्षा आपल्या कृतीमुळे किती आयुष्ये उजळली, हा विचार महत्त्वाचा आहे. आपल्या एका छोट्याशा मदतीने एखाद्या गरजू कुटुंबाच्या चेहऱ्यावर हास्य फुलू शकते. आपल्या एका संवेदनशील कृतीने एखाद्या मुलाच्या मनात आशेचा किरण निर्माण होऊ शकतो. म्हणूनच या दिवाळीत संपत्तीचे प्रदर्शन करण्यापेक्षा माणुसकीचे दर्शन घडवूया. आतषबाजीच्या आवाजापेक्षा प्रेमाचे शब्द मोठे करूया आणि केवळ घरांची नव्हे, तर मनेही उजळवूया.

दिवाळीचा खरा प्रकाश पणत्यांमध्ये नसतो, तो माणसाच्या संवेदनशील मनात आणि दुसऱ्याच्या आयुष्यात आनंद निर्माण करणाऱ्या कृतीत असतो. यंदा दिवाळी साजरी करूया, ती केवळ स्वतःसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी!

- ८२०८००१९५४

लक्ष्मीपूजनाचे महत्त्व : भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, समृद्धी आणि मांगल्याचा दीपोत्सव

माधुरी धनोकार,
अकोला

भारतीय संस्कृतीमध्ये सण-उत्सवांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक सणामागे धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरा, सामाजिक एकोपा आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा संदेश दडलेला असतो. अशाच आनंददायी आणि मंगलमय सणांपैकी एक म्हणजे दीपावली. दिवाळी हा केवळ दिव्यांचा उत्सव नसून तो प्रकाशाचा, आनंदाचा, नवचैतन्याचा आणि समृद्धीचा उत्सव आहे. या दीपोत्सवातील सर्वांत महत्त्वाचा आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा सोहळा म्हणजे महालक्ष्मी पूजन.

लक्ष्मीपूजनाची पौराणिक पार्श्वभूमी

पौराणिक मान्यतेनुसार समुद्रमंथनातून माता लक्ष्मी प्रकट झाली. हातामध्ये कमळ धारण केलेली, सुवर्णतेजाने उजळलेली आणि ऐश्वर्याचे प्रतीक असलेली माता लक्ष्मी भगवान विष्णूंच्या सहचारिणी म्हणून पूजली जाते. कमळ हे पावित्र्य, निर्मळता आणि सौंदर्याचे प्रतीक आहे. चिखलात उमलणारे कमळ जसे स्वतःचे सौंदर्य टिकवून ठेवते, त्याचप्रमाणे माणसाने संसारात राहूनही आपले विचार आणि आचरण निर्मळ ठेवावे, असा सुंदर संदेश या प्रतीकातून मिळतो.

माता लक्ष्मीची आठ रूपे म्हणजे अष्टलक्ष्मी. आदिलक्ष्मी, धनलक्ष्मी, धान्यलक्ष्मी, गजलक्ष्मी, संतानलक्ष्मी, वीरलक्ष्मी, विजयलक्ष्मी आणि विद्यालक्ष्मी अशी तिची विविध रूपे सांगितली जातात. या प्रत्येक रूपातून मानवी जीवनातील वेगवेगळ्या समृद्धीचे महत्त्व अधोरेखित होते. केवळ धन मिळणे म्हणजे समृद्धी नव्हे, तर ज्ञान, आरोग्य, धैर्य, विजय, कुटुंबसुख आणि समाधान लाभणे हीसुद्धा खरी समृद्धी आहे.

लक्ष्मीपूजनाची तयारी आणि धार्मिक विधी

दिवाळीच्या दिवसांत घराघरांत स्वच्छतेची लगबग सुरू असते. घरातील प्रत्येक कोपरा स्वच्छ करून सजवला जातो. दारासमोर सुंदर रांगोळ्या काढल्या जातात. फुलांच्या तोरणांनी प्रवेशद्वार सजवले जाते. आकाशकंदील, पणत्या आणि विद्युत रोषणाईने घराचा परिसर उजळून निघतो.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी शुभ मुहूर्तावर पूजेची तयारी केली जाते. पूजास्थानावर स्वच्छ वस्त्र अंथरून माता महालक्ष्मीची मूर्ती किंवा प्रतिमा प्रतिष्ठापित केली जाते. श्रीगणेश, माता लक्ष्मी आणि भगवान कुबेर यांचे पूजन केले जाते. हळद, कुंकू, अक्षता, फुले, हार, धूप, दीप, नैवेद्य, फळे आणि मिठाई अर्पण केली जाते. काही ठिकाणी धान्य, नाणी, दागिने आणि व्यापारी हिशोबाच्या वह्यांचेही पूजन केले जाते.

महालक्ष्मीची आरती करून कुटुंबातील सर्व सदस्य एकत्रितपणे प्रार्थना करतात. या क्षणी घरात भक्तिमय वातावरण निर्माण होते. दिव्यांच्या प्रकाशात आरतीचे स्वर घुमतात आणि संपूर्ण वातावरण मंगलमय बनते.

लक्ष्मीपूजनासोबत गणेश आणि कुबेर पूजनाचे महत्त्व

महालक्ष्मी पूजनामध्ये भगवान श्रीगणेश आणि धनाचे अधिपती कुबेर यांनाही विशेष स्थान आहे. श्रीगणेश हे बुद्धी, विवेक, ज्ञान आणि विघ्नहर्ता म्हणून पूजले जातात. कोणत्याही शुभकार्याची सुरुवात गणेशपूजनाने करण्याची परंपरा आहे.

कुबेर हे धनसंपत्तीचे रक्षक मानले जातात. लक्ष्मी ही समृद्धीची देवता, गणेश हे बुद्धी आणि विवेकाचे प्रतीक, तर कुबेर हे धनाचे रक्षण करणारे मानले जातात. या तिन्ही देवतांच्या पूजनातून धनाबरोबरच बुद्धी, योग्य निर्णयक्षमता आणि संपत्तीचा सदुपयोग करण्याची प्रेरणा मिळते.

व्यापारी वर्गासाठी लक्ष्मीपूजनाचे विशेष महत्त्व

व्यापारी, व्यावसायिक आणि उद्योजकांसाठी लक्ष्मीपूजन हा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. अनेक व्यापारी या दिवशी आपल्या दुकानांची, कार्यालयांची आणि व्यवसायाच्या ठिकाणांची स्वच्छता करून सजावट करतात. नवीन हिशोबाच्या वह्या, लेखणी, तिजोरी, धन आणि व्यापाराशी संबंधित साधनांचे पूजन केले जाते. व्यवसायामध्ये प्रगती व्हावी, आर्थिक स्थैर्य लाभावे, व्यवहारात प्रामाणिकपणा राहावा आणि वर्षभर भरभराट व्हावी, अशी प्रार्थना केली जाते. हा दिवस नवीन संकल्प करण्याचा आणि पुढील वाटचालीसाठी सकारात्मक ऊर्जा घेण्याचा दिवस मानला जातो.

दिव्यांचा प्रकाश आणि त्यामागील जीवनमूल्य

दिवाळीमध्ये प्रत्येक घरासमोर लावलेली पणती केवळ सजावटीचा भाग नसते, तर तिच्यामागे जीवनाचा गहन अर्थ दडलेला आहे. एक छोटीशी पणती स्वतः जळून दुसऱ्यांना प्रकाश देते. ती आपल्याला परोपकार, त्याग, सेवा आणि माणुसकीची शिकवण देते. आपल्या जीवनातील अज्ञान, अहंकार, मत्सर, द्वेष आणि नकारात्मक विचारांचा अंधकार दूर करून ज्ञान, प्रेम, सद्भावना आणि सकारात्मकतेचा प्रकाश निर्माण करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने दीपावली साजरी करणे होय. ज्याप्रमाणे या दिव्यापासून अनेक दिवे प्रज्वलित होतात, त्याचप्रमाणे एका चांगल्या विचारातून अनेक चांगल्या कृतींची निर्मिती होऊ शकते. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या जीवनात सद्विचारांचा दीप प्रज्वलित ठेवला पाहिजे.

थोडक्यात

नरकचतुर्दशीच्या मंगल पर्वावर नागपुरात रंगणार भक्तिमय 'कीर्तन पहाट'

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या सहकार्याने कलासंगम कला सांस्कृतिक मंडळ व लोकमान्य सांस्कृतिक व क्रीडा मंडळ यांचा संयुक्त उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय संस्कृती, संतपरंपरा आणि भक्तिसंगीताचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी नागपूरकरांना मिळणार आहे. नरकचतुर्दशी आणि लक्ष्मीपूजनाच्या मंगल पर्वाचे औचित्य साधून दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर (संस्कृती मंत्रालय, भारत सरकार) यांच्या सहकार्याने कलासंगम कला सांस्कृतिक मंडळ आणि लोकमान्य सांस्कृतिक व क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'कीर्तन पहाट' या विशेष भक्तिमय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दिनांक ८ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे ५.३० वाजता रेशीमबाग येथील संत तुकाराम उद्यान येथे हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. हा कार्यक्रम स्व. प्रदीप केशव पलांदूरकर यांना समर्पित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात ह.भ.प. अभिषेक महाराज घुसे (धमार्चार्य, विश्व हिंदू परिषद, नागपूर महानगर) यांचे सुश्राव्य कीर्तन सादर होणार आहे. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ मंडळ, टाळकरी महासंघ, पिंपळा फाटा, नागपूर यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे. कीर्तन, अभंग, संतवाङ्मय आणि पारंपरिक भक्तिसंगीताच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन या कार्यक्रमातून घडणार आहे. दीपावलीच्या मंगलमय वातावरणात पहाटेच्या प्रसन्न प्रहरी भक्तिरसाचा अनुभव घेण्याची ही नागपूरकरांसाठी एक विशेष पर्वणी ठरणार आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच दक्षिण नागपूरचे आमदार मोहन मते यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. नागपूरकर नागरिकांनी सहकुटुंब या भक्तिमय 'कीर्तन पहाट' कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाअंतर्गत अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

फलोत्पादनाला चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाअंतर्गत वर्ष २०२६-२७ या वर्षासाठी नागपूर जिल्ह्याला एकूण १०१.२३ लाख रुपयांचा आर्थिक लक्षांक प्राप्त झाला आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. अर्चना कडू यांनी केले आहे. या अभियानांतर्गत नागपूर जिल्ह्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ८०.२६ लाख रुपये, तर अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी २०.९७ लाख रुपयांचा लक्षांक निश्चित करण्यात आला आहे.

योजनेत समाविष्ट विविध घटक

या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध फलोत्पादन विषयक घटकांचा लाभ घेता येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने फुलशेती, मसाला पिके आणि विदेशी फळपिकांचा क्षेत्रविस्तार, जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन व औषधी वनस्पती लागवड, अळिंबी उत्पादन केंद्र, सामूहिक शेततळे व शेततळे अस्तरीकरण, शेडनेट हाऊस, पॉली हाऊस आणि प्लास्टिक मल्चिंग, तसेच पॅक हाऊस, कांदाचाळ, फलोत्पादन यांत्रिकीकरण, शीतगृह, शीतखोली, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, रेफर व्हॅन आणि रायपनिंग चेंबर यांसारख्या प्रकल्पाधारित घटकांचा लाभ घेता येईल.

महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

पात्र शेतकऱ्यांनी यायोजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाच्या https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'फलोत्पादन' या घटकाखाली आपले अर्ज सादर करावेत. योजनेच्या अटी, पात्रता व इतर अधिक माहितीसाठी इच्छुक शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक यांनी केले आहे.

अरोली येथे शेतकऱ्यांना वैरण (चारा) वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

अरोली येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ येथे महाराष्ट्र सरकारने जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत दुष्काळी परिस्थिती पाहता जनावरांना चाऱ्याची टंचाई भासू नये म्हणून शेतकऱ्यांना वैरण (चारा) वाटप शनिवार (ता. ७ नोव्हेंबर)ला अरोली येथील सरपंचा रोशनी प्रशांत भुरे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी तालुका शिवसेनाप्रमुख प्रशांत भुरे, पशुवैद्यकीय डॉ. सावळीकर, बेर्डेपार येथील सरपंच रेवा देशमुखसह अनेक शेतकरी उपस्थित होते.

भारताचा मालिकेतील दुसरा विजय

भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यामध्ये एकदिवसीय मालिकेचा दुसरा सामना आज खेळवण्यात आला, या सामन्याचे आयोजन न्यूझीलंडमधील वेलिंग्टन प्रादेशिक स्टेडियमवर करण्यात आले होते. या सामन्यामध्ये भारताच्या संघाने ४ धावांनी विजय मिळवला, या सामन्यामध्ये टीम इंडियाच्या गोलंदाजांची पुन्हा एकदा प्रभावी कामगिरी पाहावला मिळाली. या सामन्यामध्ये टीम इंडियाच्या गोलंदाजांसमोर न्यूझीलंडचे फलंदाज पूर्णपणे फेल झाले. भारतीय फलंदाजांनी देखील या सामन्यामध्ये निराश केले पण त्यानंतर रोहित शर्मा, श्रेयस अय्यर या खेळाडूंनी संघाची कमान सांभाळली आणि भागीदारी करुन संघाला विजय मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले.

संभाव्य पाणी टंचाई निवारणासाठी वेणा योजनेची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

पाणी पुरवठ्यासह गुणवत्ता व शुद्धीकरणावर भर



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व नियमित पाणी पुरवठा होण्यासाठी यंत्रणेने अधिक सतर्क राहून कामे पूर्ण करावीत,असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले. संभाव्य दुष्काळी परिस्थिती व पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज वाडी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेला भेट देऊन संपूर्ण व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणीदरम्यान वाडीचे नगराध्यक्ष नरेश चरडे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) बहादूरे, कार्यकारी अभियंता विद्या कानडे, उपविभागीय अभियंता नघाटे, उपविभागीय अभियंता (यांत्रिकी) बत्तूलवार तसेच वाडी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विनोद जाधव आणि संबंधित योजनेचे अभियंता उपस्थित होते.

वेणा धरण व जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करत जिल्हाधिकाऱ्यांनी इतर माहिती घेतली. या धरणातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत वाडी, देवलामेटी व आयुध निमार्णी अंबाझरीला पाणीपुरवठा केला जातो. येथील लोकसंख्या १ लाखापेक्षा अधिक असून दरदिवशी २३.६८ दशलक्ष लिटर पाण्याची मागणी आहे. सद्यस्थितीत वेणा प्रकल्पात ५६.४२ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून नोव्हेंबर २०२५ मध्ये हाच पाणीसाठा ९९.८८ टक्के होता, जो गतवर्षीच्या तुलनेत यंदा लक्षणीयरीत्या कमी आहे. यावर उपाय योजना करण्याबाबत श्री. आशीर्वाद यांनी संबंधितांशी सविस्तर चर्चा केली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, वेणा धरणाच्या पाण्यात लोह, अमोनिया आणि सेंद्रिय पदार्थ म्हणजेच बीओडी यांचे प्रमाण प्राधान्याने नियंत्रित करणे आवश्यक असल्याचे मजीप्राच्या अभियंत्यांनी सांगितले. धरणाची पाणीपातळी खालावल्यास या घटकांचे प्रमाण वाढून पारंपारिक पद्धतीने पाणी शुद्ध करणे कठीण होऊ शकते. यामुळे पाण्याच्या उपलब्धतेसोबतच गुणवत्तेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो. यावर ठोस उपाययोजना करणे गरजेचे असून याबाबत शक्य त्या सर्व पर्यायांचा अवलंब करण्यात येईल असे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी श्री आशीर्वाद यांनी येथील पाणी शुद्ध करणाऱ्या प्रक्रियेची माहिती घेत वितरण व्यवस्थेनुसार पाण्याची नियमित तपासणी करण्याचे निर्देश दिले. पाण्याच्या साठ्यात घट झाल्यास जलाशयातील दूषित पाण्यावर ओझोन, नॅनोबबल तंत्रज्ञान व फोम फॅक्शनेटर (ओझोक्रॅक्शनेशन) यांच्या संयुक्त वापराने करावयाच्या प्रात्यक्षिक चाचण्यांची उपविभागीय अभियंत्यांनी माहिती दिली. तांत्रिकदृष्ट्या येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी प्रभावीपणे शुद्ध करणे शक्य होत असून ही सकारात्मक बाब असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

पाणी शुद्धीकरण करण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश

यावर्षी वेणा धरणातील पाणीपातळी कमी झाल्यास अंबाझरीचे पाणी घेणे अनिवार्य ठरणार असून, याच पद्धतीने अंबाझरीच्या दूषित पाण्यावरही प्रक्रिया करता येईल. ही यंत्रणा वेणा व अंबाझरी या दोन्ही स्रोतांच्या पाण्यासाठी कायमस्वरूपी उपाय ठरणार असून नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होईल. त्यानुसार ओझोन, नॅनोबबल तंत्रज्ञान व फोम फॅक्शनेटर या आधुनिक पद्धतीने पाणी शुद्धीकरण करण्याचा प्रस्ताव तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी वावेळी दिले.

जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी व पाण्याच्या गुणवत्तेबाबत विशेष सूचना

जिल्हाधिकारी यांनी वाडी जलशुद्धीकरण केंद्राला भेट दिली असता येथील कार्यपद्धती, केंद्राची क्षमता, पाण्याची गुणवत्ता, देखभाल व दुरुस्ती तसेच शुद्ध पाण्याचा वितरण व्यवस्थेचा त्यांनी आढावा घेतला. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध होणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे सांगत त्यांनी जलशुद्धीकरण केंद्राची नियमित स्वच्छता, आवश्यक देखभाल-दुरुस्ती, पाण्याच्या गुणवत्तेची नियमित तपासणी आणि शुद्धीकरण प्रक्रियेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. पाण्याचे उपलब्ध स्रोत, साठवण क्षमता, पाणी उपसा, जलशुद्धीकरण प्रक्रिया, वितरण व्यवस्था, पाण्याची गळती तसेच पर्यायी जलस्रोतांच्या सद्यस्थितीचा जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी आढावा घेतला. पाण्याची गळती रोखणे, जुन्या जलस्रोतांचे पुनरुज्जीवन व पाणीसंवर्धनासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण निर्देश दिले.

पाणीपुरवठ्याच्या मूळ स्रोतापासून जलशुद्धीकरण, वितरण व्यवस्था आणि पर्यायी जलस्रोतांपर्यंत सर्व बाबींचा प्रत्यक्ष आढावा घेऊन प्रशासनाकडून पाणी टंचाईच्या संभाव्य संकटाला सामोरे जाण्यासाठी करण्यात येणाऱ्या पूर्वतयारीवर त्यांनी भर दिला.

अनुदानाची रक्कम कर्जखात्यात वळती केल्यास बँकांवर आपत्ती व्यवस्थापनांतर्गत कारवाई

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे बँकांना लेखी पत्र, दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने प्रशासनाची खबरदारी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून त्यांच्या खात्यात मदत निधी जमा केला जात आहे. याशिवाय वेगवेगळ्या योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ दिला जात आहे. अनुदानाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत कर्ज खात्यात वळती करू नये, अशा स्पष्ट सूचना आहे. बँकांनी या सुचनांचे पालन करावे. परस्पर रक्कम वळती केल्यास आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, अशा स्पष्ट सुचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी बँकांना केल्या आहे.

यावर्षीच्या खरीप हंगामात राज्यातील ३०४ तर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. हंगामातील शेतपिकांच्या नुकसानीपोटी ५ हजार प्रति शेतकरी याप्रमाणे अग्रिम मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. शासन निर्णयाप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना देण्यात आलेली मदत अत्यंत निकडीची व तात्कालिक आर्थिक दिलासा देणारी आहे. त्यामुळे बँकांनी सदर दुष्काळी मदतीचा निधी शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात अथवा इतर कोणत्याही प्रकारच्या वसुलीसाठी वळती करू नये, असे स्पष्ट आदेश आहेत.

याशिवाय प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, इतर शासकीय अनुदाने, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ, विधवा, दिव्यांग पेन्शन योजना, प्रधानमंत्री फसल बिमा योजना, नमो शेतकरी महासन्मान निधी योजना, तसेच इतर सर्व डीबीटी शासकीय मदत, अनुदानाची रक्कम बँकांना परस्पर कर्ज खात्यात वळती करता येणार नाही. सोबतच कजार्ची थकबाकी, व्याज वसुलीसाठी अनुदानाची रक्कम लीन, होल्ड किंवा फ्रीज करता येणार नाही. अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या पूर्णपणे वापरासाठी आहे.

लाभार्थ्याला ही रक्कम तात्काळ काढता येईल, याची दक्षता घ्यावी. बँकेच्या कोणत्याही शाखेने शेतकऱ्यांची, लाभार्थ्यांची मदत रक्कम कर्ज खात्यात वळती केल्यास किंवा अडवून ठेवल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित बँक व्यवस्थापनाची राहील आणि त्यावर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलमांतर्गत शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल. बँकांनी आपल्या अधिनस्त शाखांना याबाबत स्पष्ट सूचना द्यावे, याबाबत तक्रार आढळून आल्यास संबंधित बँक अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांना दिले आहे.

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाचे तीन महत्त्वपूर्ण निर्णय

पारधी व आदिम समाजासाठी विशेष पॅकेज व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेत सुधारणा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासाला चालना देणारे तीन महत्त्वपूर्ण शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. यामध्ये पारधी समाजासाठी व आदिम समाजासाठी विशेष पॅकेज तसेच अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत.

पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेज

पारधी समाजाची भटकंती थांबवून त्यांना स्थैर्य लाभावे आणि स्थलकालानुरुप उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे, वासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात विशेष तरतूद करण्यात आली आहे. न्यूक्लियस बजेट योजनेंतर्गत पारधी समाजाच्या विकासासाठी २० कोटी निधी राखीव ठेवण्यात आला आहे. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत पारधी बेडे/ वस्ती/प्रभाग सुधारणांसाठी १० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या विशेष पॅकेजअंतर्गत १०० टक्के अनुदान दिले जाणार असून, वैयक्तिक योजनेसाठी रु. ५० हजार आणि दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास सामूहिक योजनेसाठी रु. ७ लक्ष ५० हजारपर्यंतची मयार्दा राहील. यामध्ये रोजगार, कौशल्य विकास, महिला बचत गट सक्षमीकरण आणि मूलभूत सुविधांवर भर दिला जाणार आहे.

आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेज

राज्यातील कातकरी, कोलाम व माडिया या तीन आदिम जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष पॅकेज मंजूर करण्यात आले आहे. न्यूक्लिअस बजेट योजनेंतर्गत वर्ष २०२६-२७ साठी ३० कोटी आणि आदिम जमाती विकास कार्यक्रमांतर्गत १०० कोटीच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून मूलभूत व विकासात्मक कामे हाती घेतली जातील. पात्र आदिम लाभार्थ्यांना वैयक्तिक योजनेसाठी ५० हजार तर सामूहिक योजनेसाठी ७ लक्ष ५० हजार पर्यंतचे आर्थिक सहाय्य दिले जाईल.

पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेत सुधारणा

शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश न मिळालेल्या किंवा वसतीगृह सुविधा उपलब्ध नसलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे सुलभ व्हावे, यासाठी 'स्वयंम' योजनेत सुधारणा करण्यात आल्या आहेत. इयत्ता १० वी नंतरच्या दोन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या अभ्यासक्रमांसाठी ही योजना लागू राहील, असे असे प्रकल्प अधिकारी उमेश काशीद यांनी कळवले आहे.

१९४८ पासून ग्रामविकासाचा वारसा जपणारे लोहारी सावंगा

शेती हाच गावाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार, चार वॉर्ड, ८४४ कुटुंबे, २ हजार ४०० मतदार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रस्तावित भेटीच्या पार्श्वभूमीवर गावाच्या विकासप्रवासाला उजाळा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाची खरी ओळख ही गावांच्या सामाजिक, आर्थिक आणि कृषी जीवनातून दिसून येते. नागपूर जिल्ह्यातील लोहारी सावंगा हे असेच एक गाव. शेतीला केंद्रस्थानी ठेवून ग्रामविकासाची वाटचाल करणाऱ्या या गावाला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. नरखेड तालुक्यातील १९४८ मध्ये ग्रामपंचायतीची स्थापना झालेल्या लोहारी सावंगा गावाने काळानुरूप विकासाचा प्रवास सुरू ठेवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रस्तावित



भेटीच्या पार्श्वभूमीवर या गावाची सामाजिक, आर्थिक आणि कृषीविषयक वैशिष्ट्ये महत्त्वाची ठरत आहेत.

लोहारी सावंगा ग्रामपंचायतीची स्थापना १९४८ मध्ये झाली. सध्याच्या ग्रामपंचायत सदस्यांची संख्या १२ असून यात सात महिला तर पाच पुरुष सदस्यांचा समावेश आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार गावाची एकूण लोकसंख्या ४ हजार २६४ आहे. यामध्ये २ हजार ४१४ पुरुष आणि १ हजार ८५० महिलांचा समावेश आहे. गावात एकूण ८४४ कुटुंबे असून, त्यापैकी ५९० कुटुंबे एपीएल आणि २५४ कुटुंबे बीपीएल प्रवर्गातील आहेत.गावाची प्रशासकीय रचना चार वॉर्डांमध्ये विभागलेली आहे.

लोहारी सावंगा गावाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेती आहे. गावातील प्रमुख पिकांमध्ये कापूस, तूर, संत्रा, मोसंबी, सोयाबीन, हरभरा आणि गहू यांचा समावेश होतो. पारंपरिक पिकांसोबतच फळबागांच्या माध्यमातूनही शेतीला उत्पन्नाचे पर्याय उपलब्ध झाले आहेत. विदर्भातील कृषी अर्थव्यवस्थेचे प्रतिबिंब या गावातील पीकपद्धतीतून दिसून येते.

गावामध्ये एकूण ८१० नळजोडणी खातेदार असल्याची नोंद आहे. ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व्यवस्थेच्या दृष्टीने ही महत्त्वाची बाब आहे. सन २०२६ च्या उपलब्ध नोंदीनुसार गावातील एकूण मतदारसंख्या २ हजार ४०० आहे. गावाचे भौगोलिक क्षेत्रफळ ९७९.१९ चौरस हेक्टर आर आहे.

गावाचा विकास केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून शेती, पाणीपुरवठा, रोजगार, शिक्षण आणि आरोग्य अशा विविध घटकांशी जोडलेला आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, सिंचनाच्या सुविधा, शेतमालाला योग्य बाजारपेठ आणि प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून उत्पन्नवाढीच्या संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लोहारी सावंगा भेटीच्या पार्श्वभूमीवर गावातील नागरिकांच्या अपेक्षा, ग्रामीण विकासाचे प्रश्न आणि शेतीसमोरील आव्हाने यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. गावाची ऐतिहासिक ग्रामपंचायत व्यवस्था, कृषीप्रधान अर्थव्यवस्था आणि सामाजिक रचना यांचा आढावा घेत ग्रामीण भागाच्या विकासाची दिशा अधिक व्यापक करण्याची संधी या भेटीच्या निमित्ताने निर्माण झाली आहे.


सर्वांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
आम्रपाली विजेंद्र कोटांगले,
सरपंच, ग्राम पंचायत कडोतीटोला,
ता. सालेकसा, जि. गोंदिया


ग्राम पंचायत झालिया,
ता. सालेकसा, जि. गोंदियातर्फे
सर्वांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
सूचना
सर्व ग्रामवासियांना सूचित करण्यात येत आहे की, आपणाकडे शिल्लक असलेली पाणीपट्टी व घरपट्टीची थकबाकी लवकरात लवकर ग्राम पंचायत झालियाला सहकार्य करावे व शौचालय बांधकाम, आवास योजनेचे बांधकाम त्वरित पूर्ण करून पाण्याचे योग्य नियोजन करावे.
आपणास येणाऱ्या दीपावलीच्या ग्रा.पं. वतीने हार्दिक शुभेच्छा!


ग्राम पंचायत सातगाव,
ता. सालेकसा, जि. गोंदियातर्फे
सर्वांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
सूचना
सर्व ग्रामवासियांना सूचित करण्यात येत आहे की, आपणाकडे शिल्लक असलेली पाणीपट्टी व घरपट्टीची थकबाकी लवकरात लवकर ग्राम पंचायत सातगाव ला सहकार्य करावे व शौचालय बांधकाम, आवास योजनेचे बांधकाम त्वरित पूर्ण करून पाण्याचे योग्य नियोजन करावे.
आपणास येणाऱ्या दीपावलीच्या ग्रा.पं. वतीने हार्दिक शुभेच्छा!


दीपरंग
२०२६


Happy Diwali - Shubh Deepawali
GK Arts and Science
Mahila Mahavidyalaya,
Kawarabandh
Wishing you a joyful, prosperous and bright Diwali
Secretary
Shri Gulchand K. Dasariya
Principal
Prof. Pratima R. Yadav


समर्थ रामदास शिक्षण संस्था, अरोली
संचलित
समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,अरोली
ता.मोहाडी, जि.नागपूर
दीपावली व नववर्षाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक :
॥ शुभ दीपावली! मंगलमय दीपावली! ॥


ॲड. पवन छबुताई देवराव मेश्राम
सभापती
नियोजन आणि विकास समिती,
न.प.बल्लारपूर
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा...!


दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
राजु फुंडे
उपाध्यक्ष,
तालुका मराठी पत्रकार संघ, सालेकसा
दैनिक सिंहवाणी वृत्त, तालुका प्रतिनिधि
कल्पना डिजिटल फोटो स्टुडिओ
बाजार चौक, नगर पंचायत जवळ, सालेकसा, जि. गोंदिया


ग्रामपंचायत नांदगाव तर्फे
शुभदीपावली
निमित्त सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा..!
:शुभेच्छुक:
सरपंच श्री. दीपक पडोळे, उपसरपंच सौ. सुनीता रामेश्वर थोटे,
ग्राम विकास अधिकारी श्री. निशांत झिंगणे,
ग्रामपंचायत सदस्यगण सर्व श्री. कैलास महादुले, श्री. बेनीराम पडोळे, श्री. मंसाराम थोटे,
सौ. वर्षा मंसाराम सेलोकर, सौ. उषा सुधीर आष्टणकर, सौ. योगिता योगेश खोब्रागडे.


ग्रामपंचायत कार्यालय निसतखेडा,पं. स. मौदाकडून समस्त जनतेला
दिवाळी व भाऊबीजेच्या
हार्दिक शुभेच्छा..!
सौ.प्रज्ञा राहुल बावने
सरपंचा
श्री.आशीष चव्हाण
उपसरपंच
श्री.विनोद तागडे.
ग्रामविकास अधिकारी
सन्मानीय सदस्यगण सर्व : श्री. टेकचंद डहरे, श्री. रजत महादुले, सौ. विजयलक्ष्मी डहरे
सौ. पंचफुला शेंदरे, सौ. मीरा नारनवरे, सौ. गीता भिलकर.


ग्रामपंचायत कारुटोला,
ता. सालेकसा,
जि. गोंदियातर्फे
सर्वांना
दिवाळीच्या
हार्दिक
शुभेच्छा
श्री. रितेश किसन शहारे
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय, कारुटोला
कु. किरण के. तिराले
प्रशासक
ग्रामपंचायत कार्यालय, कारुटोला


नव्या दिशेने, नव्या विचाराने,
पाऊल तुमचे पुढे पडावे.
नव्या भविष्याच्या तेजस्व ज्योतीने,
तुमचे प्रगतिपथ प्रकाशमान व्हावे.
दिपावली
निमित्त समस्त
वरोरा वासीयांना
हार्दिक शुभेच्छा...!
योगिता भारत नैरकर
उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती नगर परिषद, वरोरा
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट


भारतीय जनता पार्टी चाचेर मंडळ
दिपावली विशेष चिंतन
आकाशकंदील अन
पणत्यांची रोषणाई,
फराळाची लज्जत न्यारी,
नव्या नवलाईची ही दिवाळी,
झगमगली दुनिया सारी
BJYM
कैलास बरबटे
माजी जि.प. सदस्य
संजुदादा वाघमारे
आकाश आजनुजा वाघाचे मंडळ
कैलास सोमनाथे
महामंत्री भाजपा चाचेर मंडळ
खेमराज चाफले
माजी प.स. उपसभापती


॥ श्री गणेशाय नमः ॥
स्वप्नील सिमेंट विटा अँड
बिल्डिंग मटेरियल सप्लायर
गुणवत्ता | जलद सेवा
परवडणारे दर
स्वप्नील कावळे • पत्ता-मु.नक्षी
8308151944 / 7666441533
विश्वसनीय • दर्जेदार • परवडणारा


मौदा नगरपंचायतमधील
सर्व नागरिकांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक -
रमेश कुंभलकर,
नगरसेवक तथा
शहराध्यक्ष, मौदा भाजप


मौदा तालुक्यातील
सर्व जनतेला
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक -
देवेंद्र पं. गोडबोले
माजी जि. प. सदस्य


Bharatgas
COOK FOOD SERVE LOVE
समस्त भारत गॅसच्या
ग्राहकांना
शुभ दिपावली
:शुभेच्छुक:
श्री सुनील रवींद्रजी आडगूळकर
संचालक : भारत गॅस एजन्सी अरोली


मौदा नगरपंचायत
क्षेत्रातील सर्व
नागरिकांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा....
शुभेच्छुक -
उमेशभाऊ गभणे
माजी नगराध्यक्ष तथा
नगरसेवक, न.पं. मौदा


सर्व नागरिकांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
ही दिवाळी आपल्या सर्वांच्या
जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य
आणि आनंद घेऊन येवो,
हीच मनःपूर्वक शुभेच्छा..!
राकेश पौनिकर
भिवापूर तालुका अध्यक्ष
महाराष्ट्र नवनिर्माण सेना

थोडक्यात

इंदिरा गांधी निराधार योजनेच्या रखडलेल्या अनुदानासाठी सावनेर तहसीलदारांना निवेदन



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

इंदिरा गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना मागील काही महिन्यांपासून अनुदानाची रक्कम न मिळाल्यामुळे सावनेर तालुक्यातील निराधार, वृद्ध आणि गरजू नागरिकांसमोर गंभीर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. हा रखडलेला निधी तात्काळ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) व काँग्रेस पक्षाच्यावतीने सावनेरच्या तहसीलदारांना नुकतेच एक निवेदन देण्यात आले. निराधार व वृद्ध नागरिकांसाठी हे मानधन जगण्याचा एकमेव आधार असतो. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वेळेवर पैसे मिळत नसल्याने त्यांना दैनंदिन गरजा भागवणे आणि औषधोपचाराचा खर्च उचलणे कठीण झाले आहे. शासनाने याप्रकरणी तातडीने गांभीर्याने दखल घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.या शिष्टमंडळात व निवेदनावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष गुड्डू बोकडे, काँग्रेस पक्षाचे अनिल पुरी, रंजना गावंडे, प्रियंका धुंडाळ, दीपक चौरे, पंकज रामेकर आणि सचिन गजभिये यांच्यासह मोठ्या संख्येने निराधार योजनेचे लाभार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते.

'निराधारांचा हक्काचा पैसा मिळालाच पाहिजे'

"निराधारांच्या हक्काचा पैसा त्यांना वेळेवर मिळालाच पाहिजे, त्यांच्या या न्याय्य व हक्काच्या मागणीसाठी आमचा संघर्ष असाच कायम सुरू राहील," असा ठणकावून पवित्रा उपस्थित नेत्यांनी यावेळी घेतला.

पाणी जपून वापरा, संभाव्य टंचाई टाळण्यासाठी नगर परिषद सज्ज

उमरेड नगर परिषदेत पाणीपुरवठा आढावा बैठक, गळती रोखणे, तलाव खोलीकरणासह विविध उपाययोजनांवर चर्चा



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड - मनिष शिंगणे

यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने उमरेड शहरासह परिसरात संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर उमरेड नगर परिषदेत पाणीपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. शहरातील नागरिकांना भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासह विविध उपाययोजनांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन, पाण्याचा वापर, पाणीगळती रोखणे, तलावांचे खोलीकरण, एक दिवसाआड पाणीपुरवठ्याची शक्यता, जलशुद्धीकरण प्रक्रियेदरम्यान वाया जाणारे पाणी कमी करणे आदी महत्त्वाच्या विषयांचा आढावा घेण्यात आला.

उमरेड शहरातील सर्व विहिरी, हातपंप तसेच उपलब्ध जलस्रोतांची सद्यस्थिती तपासून त्यांचा योग्य वापर करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. पाणीपुरवठा करताना होणारी गळती तातडीने शोधून दुरुस्त करण्यावर भर देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करताना वाया जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करून त्याचा पुनर्वापर किंवा योग्य पद्धतीने उपयोग करण्याबाबतही विचार करण्यात आला. कमी पावसामुळे जलसाठ्यावर होणारा परिणाम लक्षात घेता तलावांचे खोलीकरण व जलसाठा वाढविण्याच्या उपाययोजनांवरही बैठकीत चर्चा झाली. उपलब्ध पाण्याचा साठा दीर्घकाळ टिकविण्यासाठी नियोजनबद्ध पाणीपुरवठा करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, नागरिकांनीही पाण्याचा गरजेपुरताच वापर करावा, नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवू नये, घरगुती पातळीवर पाण्याची बचत करावी तसेच उपलब्ध पाणी जपून ठेवावे, असे आवाहन करण्यात आले. संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नगर परिषद प्रशासनासोबतच नागरिकांनीही जबाबदारी स्वीकारल्यास उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करता येईल. त्यामुळे 'पाणी आहे म्हणून वाया घालवू नका; प्रत्येक थेंब जपून वापरा' हा संदेश या बैठकीतून देण्यात आला. यावेळी अध्यक्षा प्राजक्ता कारू उपाध्यक्ष तथा पाणी पुरवठा सभापती अमित झाडे, विरोधी पक्षनेता विशाल देशमुख, सत्तापक्षनेता सतीश चौधरी, पाणी पुरवठा समिती सदस्य सुरेश चिचमलकर, रंजना बारेकर, क्षितिज खानोरकर, प्रणय मेश्राम मुख्याधिकारी डॉ कुलभूषण रामटेके, उपमुख्य अधिकारी साळुंखे, पाणी इन्चार्ज विनोद मेश्राम उपस्थित होते.

एल निनोमुळे पाणीटंचाई अधिकच गंभीर

हैदराबाद : एल निनोचा देशावर विनाशकारी परिणाम झाला आहे. सर्वांत आधी एल निनोमुळे पावसाळ्यात पावसाचे प्रमाण कमी झाले आणि नंतर भात व कडधान्यांसारख्या खरीप पिकांचे नुकसान झाले. आता, नजीकच्या भविष्यात, पाण्यावरही संकट येऊ शकते. कारण केंद्रीय जल आयोगाचा ताजा अहवाल हीच आकडेवारी दर्शवत आहे. पावसाळ्यातील दुष्काळाचे आता पाण्याच्या संकटात रूपांतर झाले आहे. कमी पावसाचा थेट परिणाम देशातील प्रमुख धरणे आणि जलाशयांवर झाला आहे, जे आता त्यांच्या क्षमतेच्या ३३ टक्के रिकामे झाले आहेत. दक्षिण भारताला याचा सर्वाधिक फटका बसला आहे, जिथे कर्नाटक आणि केरळमधील जलाशयांमधील पाण्याची पातळी नीचांकी पातळीवर पोहोचली आहे. उत्तर प्रदेश, बिहार आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी एक धरण आणि जलाशय पूर्णपणे कोरडे पडण्याच्या मार्गावर आहे, म्हणजेच पाणीसाठा शून्य झाला आहे.

'गूँज ऑफ सीताराम'मध्ये भक्तिसंगीताचा जागर

'हनुमान अंश' चित्रपटाच्या टीमची सुरेल प्रस्तुती, तरुणाईसह हजारो राम व हनुमान भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

'संगीत में भक्ति, भक्ति में सभी का संगम' या संकल्पनेतून आयोजित 'गूँज ऑफ सीताराम' या भव्य भजन बैठकीत भक्तिसंगीत, रामभक्ती आणि सामूहिक गायनाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. पारंपरिक भजनांना आधुनिक संगीताची जोड देत साकारलेल्या या कार्यक्रमाने नागपूरकरांना सामूहिक राम व हनुमान भक्तीचा अविस्मरणीय अनुभव दिला.

झिरो माईल यूथ फाउंडेशनच्या वतीने मानकापूर इनडोअर स्टेडियम येथे आयोजित या कार्यक्रमात 'हनुमान अंश' चित्रपटाच्या टीमने सादर केलेल्या भक्तिगीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. 'जय श्रीराम'च्या जयघोषाने संपूर्ण स्टेडियम दुमदुमून गेले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने जनरेशन झी आणि जनरेशन अल्फा ची उपस्थिती होती. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर, झिरो माईल यूथ फाउंडेशनचे अध्यक्ष अजय संचेती, संचालक कल्याण देशपांडे, समय बनसोड आणि प्रशांत कुकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमात 'हनुमान अंश' चित्रपटाचे दिग्दर्शक व लेखक विशाल चतुर्वेदी, संगीतकार शांतनू सुदामे व धीरेंद्र मुलकलवार, गायक साधू सुशील तिवारी, सुनील लोधी, ऋषी पाठक, श्रेयस धर्माधिकारी आणि निवेदिता पद्मनाभन यांच्यासह सर्व चमूचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच रील स्पर्धेतील विजेत्यांचाही गौरव करण्यात आला.

भक्तिगीतांनी बांधली स्वरांची मैफल

'चले रे मनवा राम भजन की ओर' आणि 'सीताराम सीताराम' अशा गीतांनी भक्तिमय वातावरणाची निर्मिती झाली. गायक साधू सुशील तिवारी यांनी पार्वती आणि महादेव यांच्या आराधनेचे आवागमन, तसेच हे खरारी यांसारखी भक्तिगीते सादर केली. त्यांच्या पार्वती या गीताला उपस्थितांनी वन्समोअरची दाद दिली.

दृष्टिहीन गायक सुनील लोधी यांनी हनुमंताचे स्मरण करणारे ओ मैं तेरे भरोसे हनुमान, सागर में नैया डाल दी, हे भजन अत्यंत भावपूर्ण पद्धतीने सादर केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी वन्समोअरची मागणी केली. माझे चाहतेच माझे नेत्र आहेत, असे भावनिक उद्गार त्यांनी व्यक्त केले. जब मन भारी हो जाए, सीताराम गाइये या गीतातूनही त्यांनी रामनामाचा महिमा अधोरेखित केला.

राष्ट्रसंतांचे भजन आणि हनुमान चालीसा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव, हे लोकप्रिय भजन धीरेंद्र मुलकलवार यांनी सादर केले. तर श्रेयस धर्माधिकारी यांनी भक्त की सुन लो पुकार, जय हनुमान, ही हनुमान स्तुती सादर केली. त्यांच्या सादरीकरणाने प्रभावित झालेल्या नितीन गडकरी यांनी त्यांना पुन्हा एकदा हे गीत सादर करण्याचा आग्रह केला.

यावेळी डॉ. विशाल चतुर्वेदी यांनी त्यांनी चित्रपट निर्मिती मागची भूमिका विषद केली. नीम करोली बाबा यांनी जेल मध्ये असताना भिंतीवर लिहिलेली हनुमान चालीसा त्यांच्या चित्रपट निर्मिती मागची प्रेरणा असल्याचे ते म्हणाले. त्यांनी संगीतबद्ध केलेली हनुमान चालीसेचे यावेळी सादीकरण केले. हे सादरीकरण सुरू होताच उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे आपले पादत्राणे काढून भक्तिभावाने सहभाग घेतला. संपूर्ण वातावरण रामनाम आणि हनुमंताच्या भक्तीने भारावून गेले.

नागपूरचे गायक ऋषी पाठक यांनी आपल्या शहरात सादरीकरण करण्याचा आनंद व्यक्त केला. त्यांनी स्वतः संगीतबद्ध केलेले महात्मा गांधी यांचे वैष्णव जन तो तेने कहिये, हे भजन सादर केले. आसावरी गलांडे-देशपांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

लता मंगेशकर विद्यापीठाचा अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठासोबत संशोधन सहकार्याचा करार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

लता मंगेशकर विद्यापीठ, हिंगणा रोड, नागपूरने स्थापनेनंतर अवघ्या महिनाभराच्या आत अमेरिकेतील जागतिक स्तरावर प्रतिष्ठित असलेल्या स्टॅनफोर्ड विद्यापीठासोबत संशोधन सहकार्याचा महत्त्वपूर्ण करार केला आहे. क्लिनिकल माइंड एआय या विषयांतर्गत हा करार करण्यात आला असून, कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित रुग्ण सिम्युलेशन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून आरोग्य विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना क्लिनिकल रिझनिंग अर्थात रुग्णाच्या लक्षणांचे विश्लेषण करून योग्य निदान व उपचार निश्चित करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विद्यापीठाने आरोग्य क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधनासाठी विकसित केलेल्या शाइन (SHINE – Superintelligence and Health Innovation Ecosystem) या विशेष संशोधन परिसंस्थेच्या माध्यमातून हे सहकार्य राबविण्यात येणार आहे.

लता मंगेशकर विद्यापीठाचे मुख्य सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. आशिषराव देशमुख, सल्लागार डॉ. हृदय देशमुख आणि विद्यापीठाचे वाईस चान्सलर डॉ. काजल मित्रा यांच्या सहकार्याने हा करार करण्यात आला. विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. नीरज देशपांडे यांनी करारावर स्वाक्षरी केली.

डॉ. वकार एम. नकवी (उपसंचालक - संशोधन आणि आंतरराष्ट्रीय सहयोग, आणि प्रमुख - SHINE) यांनी या सहकार्याची संकल्पना मांडली. मुख्य सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली या सहकार्याची संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यात आली.

दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी लता मंगेशकर विद्यापीठात शाइन या संशोधन परिसंस्थेचे औपचारिक उद्घाटन वडोदरा येथील लोकसभा खासदार डॉ. हेमांग जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष श्री. कृष्णराज महाडिक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. हृदय देशमुख यांचीही उपस्थिती होती.

या करारानुसार लता मंगेशकर विद्यापीठाच्या चारही संलग्न महाविद्यालयांमधील म्हणजेच वैद्यकीय, दंतवैद्यकीय, फिजिओथेरपी आणि नर्सिंग शाखांमधील प्राध्यापक व विद्यार्थी स्टॅनफोर्ड विद्यापीठासोबत संयुक्त संशोधनात सहभागी होणार आहेत. वैद्यकीय शिक्षण, अध्यापन आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्य मूल्यांकनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सिम्युलेशन तंत्रज्ञानाचा कसा उपयोग होऊ शकतो, याचा अभ्यास या संशोधनातून केला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना कृत्रिमरीत्या तयार केलेल्या रुग्णांच्या विविध परिस्थितींवर आधारित केस स्टडीजच्या माध्यमातून रुग्णांचा वैद्यकीय इतिहास जाणून घेणे, रोगनिदान करणे आणि योग्य उपचार पद्धती निश्चित करणे याचा सराव करता येणार आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या चिकित्सक विचारक्षमतेत कितपत सुधारणा होते, याचे शास्त्रीय मूल्यमापनही करण्यात येईल.

तसेच भारतीय आरोग्य व्यवस्थेतील परिस्थिती आणि वैद्यकीय गरजांना अनुरूप अशा रुग्णांच्या केस स्टडीज तयार करण्यासाठी प्राध्यापकांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. या संशोधनाचे निष्कर्ष लता मंगेशकर विद्यापीठ आणि स्टॅनफोर्ड विद्यापीठातील संशोधक संयुक्तपणे प्रकाशित करणार आहेत.

यावेळी बोलताना विद्यापीठाचे मुख्य सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता आज जगभरातील डॉक्टर आणि आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिकांच्या प्रशिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणत आहे.

जागतिक स्तरावर प्रतिष्ठित असलेल्या स्टॅनफोर्ड विद्यापीठासोबतचे हे सहकार्य लता मंगेशकर विद्यापीठातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना या परिवर्तनाचा अविभाज्य भाग होण्याची संधी उपलब्ध करून देणार आहे. तसेच भारतातील आरोग्य क्षेत्रातील संशोधनाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी आणि त्याचे प्रत्यक्ष वैद्यकीय सेवेत उपयोजन करण्यासाठी अर्थपूर्ण संशोधन करण्याची संधीही या माध्यमातून मिळणार आहे.

कचऱ्याच्या पोत्यात आढळले दोन पाय

पिंपरी-चिंचवडमधील पिंपळे गुरव परिसरात शुक्रवारी सकाळी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. काटेपुरम चौक ते रामकृष्ण मंगल कार्यालयादरम्यान श्रीनगर गल्ली क्रमांक तीन येथे कचरा गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एका पोत्यावर रक्ताचे डाग दिसले. सुरुवातीला त्यांना पोत्यात प्राण्याचे अवशेष असल्याचा संशय आला. पण पुढचा प्रकार पाहून त्यांच्या पायाखालची जमीन सरकरील. कर्मचाऱ्यांनी पोते उघडून पाहिले आणि त्यात गुडघ्यापासून वेगळे केलेले पुरुषाचे दोन पाय दिसले. त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. घटनास्थळी दाखल झालेल्या सांगवी पोलिसांनी तपास सुरू केला. पोत्यामध्ये पोलिसांना एक सिमकार्डचे कव्हर आढळले. त्यावरील मोबाइल क्रमांकाच्या आधारे तपासाची दिशा मिळाली.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एकनाथ शिंदे यांचा पुढाकार, रामटेकमध्ये दिवाळी शिधा वाटपाचा शुभारंभ

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते दिव्यांग बांधव आणि एकल विधवा भगिनींना शिधा वाटप

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

महाराष्ट्र राज्यातील ३०० हून अधिक तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाल्याच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांना दिवाळी शिधा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सामाजिक उपक्रमांतर्गत रामटेक विधानसभा मतदारसंघात १०० टक्के दिव्यांग बांधव तसेच एकल विधवा भगिनींना दिवाळी शिधा देण्याचा उपक्रम राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी हाती घेतला आहे.

शनिवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ रोजी रामटेक येथील राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांच्या संपर्क कार्यालयात त्यांच्या हस्ते दिव्यांग दांपत्य आणि विधवा भगिनींना दिवाळी शिधा वितरित करून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.



यावेळी बोलताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले की, महाराष्ट्राला एकनाथ शिंदे यांच्यासारखे संवेदनशील नेतृत्व लाभले, याचा अभिमान वाटतो. स्वतःचे आयुष्य गरिबीत आणि संघर्षात व्यतीत केलेल्या व्यक्तीलाच गरिबांच्या दुःखाची आणि अडचणींची खरी जाणीव असते. शिंदे साहेबांनी आपल्या अनुभवातून समाजातील प्रत्येक घटकाच्या वेदना समजून घेतल्या असून मुख्यमंत्री असतानाही त्यांनी अनेक लोककल्याणकारी निर्णय घेतले आहेत.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या विचारांचा वारसा जपत तसेच धर्मवीर आनंद दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या एकनाथ शिंदे यांनी नेहमीच समाजकारणाला प्राधान्य दिले आहे. कोरोना महामारीच्या कठीण काळातही त्यांनी गरजू कुटुंबांना मदतीचा हात दिला होता. आता दुष्काळाच्या संकटातही त्यांनी गरजूंना मदत करण्याची भूमिका घेतली आहे, असे जयस्वाल यांनी सांगितले.

या दिवाळी शिध्यामध्ये पोहे, साखर, मैदा, बेसन यांसह दैनंदिन वापरातील अनेक आवश्यक वस्तूंचा समावेश आहे. शेतकरी, शेतमजूर, गरीब कुटुंबे, दिव्यांग बांधव आणि एकल विधवा भगिनींच्या घरातही दिवाळीचा आनंद आणि गोडवा निर्माण व्हावा, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिवसेनेच्या प्रत्येक आमदाराने आपल्या मतदारसंघातील गरजू नागरिकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. या उपक्रमात योगदान देणे ही केवळ जबाबदारी नसून लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य आहे. रामटेक मतदारसंघातील जास्तीत जास्त गरजू नागरिकांपर्यंत ही मदत पोहोचविण्याचा आपला प्रयत्न राहील, असेही जयस्वाल म्हणाले.

दरम्यान, लाभार्थी महिलांशी संवाद साधताना काही महिलांनी स्वतःला मदत करण्याऐवजी आर्थिकदृष्ट्या अधिक अडचणीत असलेल्या विधवा भगिनींना मदत करावी, अशी भावना व्यक्त केली. त्यांच्या या संवेदनशील आणि मोठ्या मनाचे कौतुक करत जयस्वाल यांनी आशा सर्व भगिनींचे आभार मानले. तसेच अधिकाधिक गरजू महिलांपर्यंत मदत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे, पात्र लाभार्थ्यांना हा दिवाळी शिधा घरपोच पोहोचविण्यात येणार आहे. ज्या पात्र लाभार्थ्यांना शिधा मिळणार नाही, त्यांनी गावसखी किंवा गावातील शिवसेना पक्षाच्या बूथप्रमुखांशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

समाजातील शेवटच्या घटकाच्या घरातही दिवाळीचा प्रकाश आणि आनंद पोहोचावा, हीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भावना असून, त्याच सामाजिक बांधिलकीतून रामटेक मतदारसंघात हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी यावेळी सांगितले. यावेळी शिवसेना रामटेक तालुका प्रमुख विवेक तुरक, पारशिवनी तालुका प्रमुख राजु भोस्कर, मौदा तालुका प्रमुख प्रशांत भुरे प्रामुख्याने उपस्थित होते.

KGN Artificial Jewellery & Cosmetics & Garments

पत्ता : चेमरी गेट के बाजु में, खापरखेडा ९३७०१०६२४६, ८४२१८५८०५४

समस्त ग्रामवासियांना दिवाळी, भाऊबिजेनिमित्त

हार्दिक शुभेच्छा

श्री मंगल ग्रामीण सहकारी पत संस्था मर्या. खापरखेडा
दिवाळी
हार्दिक शुभेच्छा
सौर ऊर्जा कर्ज 8% वाहन कर्ज 9%
90 दिवसांपर्यंत
SOLAR LOAN VEHICLE LOAN
श्री मंगल सोने तारण कर्ज 1%
शाखा - खापरखेडा सावनेर ब्रां. टाकळी पारशिवणी

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
शालीनी चवरे सरपंच, भानेगाव
अनेश चवरे सामाजिक कार्यकर्ता

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
हेमराजसिंह परिहार उपसरपंच चिचोली (खापरखेडा)
राजकुमारसिंह परिहार माजी उपसरपंच चिचोली (खापरखेडा)

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
राजेश (बळी) गायकवाड
भाजपा किसान आघाडी जिल्हा उपाध्यक्ष

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
विजय पाटील
सामाजिक कार्यकर्ता भाजपा

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
निखिल भुरकुंडे सामाजिक कार्यकर्ता
हर्ष भुरकुंडे सामाजिक कार्यकर्ता

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
कुणाल भोस्कर
सामाजिक कार्यकर्ता

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
सिताराम लांजेवार
सामाजिक कार्यकर्ता

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा...
राजेश (बळी) गायकवाड भाजपा किसान आघाडी जिल्हा उपाध्यक्ष
विजय पाटील सामाजिक कार्यकर्ता भाजपा
सचिन नागरकर माजी भाजपा सावनेर तालुका सचिव
तेजराम माकडे भाजपा माजी शहर अध्यक्ष खापरखेडा
सौ. निता श्रीकांत जालंदर सामाजिक कार्यकर्ता

अशोक वंजाळ सामाजिक कार्यकर्ता
प्रविण धोटे सामाजिक कार्यकर्ता
राजु गभणे सामाजिक कार्यकर्ता
मनोज वन्सोड माजी सरपंच, नांदोरी, नंदापूर
अभिनव मांगळूकर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा नागरिक सहकारी पतसंस्था मर्या. खापरखेडा

रोहित वासनिक सामाजिक कार्यकर्ता
रमेशचंद्र जोगे सामाजिक कार्यकर्ता
लखन श्रीवास्तव सामाजिक कार्यकर्ता
नागेश निकोसे सामाजिक कार्यकर्ता
राकेश नानेपाग प्रो. जगदंबा इंडेन खापरखेडा

PRIYANKA ENERGYTECH PVT. LTD.
CERTIFIED ISO 9001:2015 COMPANY
Connoisseurs In : Removal of stones, Foreign and Extraneous Materials from Running Cool-Conveyors in CHP : Mechanical Maintenance : Industrial Painting & House-Keeping.

Bharat Petroleum
माँ जगदंबा पेट्रोलियम
समस्त ग्रामवासियांना दिवाळी, भाऊबिजेनिमित्त
प्रो. निलेश महाजन
अमित महाजन
अन्ना मोड, खापरखेडा
हार्दिक शुभेच्छा!

जाहिरात संकलन : श्रीकांत फुलाबाई जयसिंग जालंदर, सावनेर तालुका प्रतिनिधी मो. ७२१९७१०२१८